



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २३९ * नांदेड * सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# भारताला ‘५ कमकुवत’ देशांच्या यादीत ठेवणारे आता जीडीपी वाढीवर शंका घेताहेत!

## पंतप्रधान मोदींचा विरोधकांवर घणाघात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारतीय अर्थव्यवस्थेचा ७.८ टक्क्यांच्या विकासदर अर्थात GDP ग्रोथ आणि आर्थिक प्रगतीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या विरोधकांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट निशाणा साधला आहे. ते म्हणाले, ज्यांनी भारताला सर्वात कमकुवत देशांच्या यादीत ढकलले, ते आज जीडीपीवर प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यांना आज देशाची ही वेगवान आर्थिक घोडदौड पचवणे कठीण जात आहे. मोदी दिल्लीच्या श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या शताब्दी सोहळ्यात बोलत होते. त्यांना आता देशाच्या विकासाची आकडेवारी पचवणे अवघड जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील सकारात्मक बदल आणि ७.८% एवढ्या प्रभावी तिमाही जीडीपी विकास दरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या विरोधकांना उद्देशून मोदी म्हणाले,



ज्यांनी एकेकाळी भारताला ‘फ्रजाइल ५’ देशांच्या यादीत ठेवले होते, त्यांना आता देशाची आर्थिक प्रगती आणि विकासाची आकडेवारी पचवणे अवघड जात आहे. एवढेच नाही तर, विरोधकांना निराशावादी आणि ईश्वरनिंदक म्हणत, देशाच्या प्रगती–मुळे चिडलेले लोक खोटे बोलण्याची मोहीम चालवत आहेत, मात्र शेवटी विजय सत्य शक्तीचाच होईल, असेही मोदी म्हणाले.

विरोधी पक्षांवर मिश्किल टीका करताना मोदी म्हणाले, समाजात अथवा घरातही काही ‘नाराज फुफा’ असतात. ज्या प्रत्येक चांगल्या कामात काही तरी त्रुटीच शोधायची सवय लागलेली असते. तशीच अवस्था विरोधकांची झाली आहे. मग ते यूपीआय असो किंवा नवीन संसद भवन असो अथवा बुलेट ट्रेन असो. प्रत्येक नव्या उपक्रमात ते याची काय गरज होती? असेच विचारतात.

स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘दिमागी नक्षल’ असा शब्द प्रयोग केला होता. त्यावरून झालेल्या गदारोळासंदर्भात बोलताना ते म्हणाले, मी तर फक्त एक होमिओपॅथीची गोळी दिली होती आणि सर्व दिमागी नक्षल हळूहळू बाहेर आले. आता देशातील जनतेला अशा मानसिकतेचे खरे रूप समजले आहे.

## दिल्लीत ५० वर्षे जुनी इमारत कोसळली, ३ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – दिल्लीच्या सत्य निकेतन परिसरात रविवारी एक पाच मजली इमारत कोसळली, ज्यात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आणि तीन जण गंभीर जखमी झाले. ही इमारत ४०–५० वर्षे जुनी होती आणि त्यात वसतिगृह होते. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, अपघाताच्या वेळी विद्यार्थी त्यांच्या खोल्यांमध्ये होते, तर तळघरात खोदकाम सुरू होते. नऊ जणांना वाचवण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीत २०–२५ खोल्या होत्या, ज्यात प्रत्येकी दोन विद्यार्थी राहत होते. अपघाताच्या वेळी इमारतीत ५० हून अधिक लोक होते.

इमारतीचा मालक, आनंद बन्सल, गुरुग्राममध्ये राहतो. पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या एका तरुणाने मदतीसाठी आवाहन करणारा स्वतःचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका तरुणाने भास्करच्या वार्ताहराला सांगितले की, तो तरुण त्याचा मित्र होता आणि तो त्याला वाचवण्यासाठी वारंवार फोन करत होता. घटना दुपारी १:३० वाजताची आहे. स्थानिक लोक हातोड्याने ढिगारा हटवण्याचा प्रयत्न करत आहेत. ढिगाऱ्याखाली काही गाड्याही दबल्या आहेत. अहवालानुसार, ढिगाऱ्याशेजारी आणखी एक इमारत कोसळण्याच्या स्थितीत आहे.

## नांदेडमध्ये डीजेचा दणदणाट बंद! नियम मोडला तर मंडळासह डीजे मालकावर थेट गुन्हा – डॉ. निलाभ

**नांदेड (प्रतिनिधी)**– गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी नांदेड जिल्हा पोलीस दलाने मोठा निर्णय घेत डीजेवर पूर्ण बंदी घातली आहे. त्यामुळे यंदा गणेशोत्सवात



कर्णकर्कश डीजेचा आवाज ऐकू येणार नाही. पोलिसांचे आवाहन धुडकावून जर गणेशोत्सव काळात ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी ‘दै. गोदातीर समाचार’शी बोलताना सांगितले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानंतर राज्यभरात डीजे बंदीची अंमलबजावणी सुरू झाली असून त्याच धर्तीवर नांदेडमध्येही पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी हा निर्णय लागू केला आहे. या निर्णयामुळे अनेक गणेश मंडळांना धक्का बसला असला तरी नागरिकांकडून स्वागत होत आहे.

### पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन

गणेशोत्सव हा पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा व्हावा, यासाठी मंडळांनी डीजे, मोठ्या आवाजाचे ध्वनिक्षेपक व ध्वनिप्रदूषण करणारी साधने वापरू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. त्याऐवजी ढोल, ताशा, लेझीम, हलगी यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा वापर करून उत्सवाची संस्कृती जपावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### कायदा व सुव्यवस्थेसाठी सतर्कता

गणेशोत्सव, दहीहंडी व आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. ध्वनिप्रदूषणामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण व सर्वसामान्यांना त्रास होऊ नये यासाठी ध्वनीविषयक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नियमांचे उल्लंघन करून कोणी डीजे लावल्यास संबंधित गणेश मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, आयोजक तसेच डीजे चालक व मालक यांच्यावर ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक कायदा व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी दिला आहे.

## मान्सून परतणार म्हणेपर्यंत बंगालच्या उपसागरात पुन्हा खळबळ

### १३ ते १५ सप्टेंबरला नव्या पावसाळी प्रणालीची चाहूल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मान्सून परतीच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू असतानाच बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा हवामान प्रणाली सक्रिय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान मॉडेल्सनुसार १३ ते १५ सप्टेंबरदरम्यान बंगालच्या उपसागरात नवीन कमी दाबाचे क्षेत्र किंवा डिप्रेशन तयार होण्याची शक्यता आहे.

संभाव्य प्रणालीचा प्रवास आंध्र प्रदेश आणि तेलंगणा मार्गे महाराष्ट्राच्या दिशेने होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यानंतर ही प्रणाली गुजरातच्या दिशेने सरकण्याची शक्यता आहे. मात्र सध्या हा प्रारंभिक अंदाज असून पुढील काही दिवसांत तिची दिशा, तीव्रता आणि मार्गात बदल होऊ शकतो.

या प्रणालीच्या प्रभावामुळे महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि गुजरातच्या काही भागांत पावसाचा जोर वाढू शकतो. काही ठिकाणी मुसळधार पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांच्या दृष्टीने हा पाऊस म हत्त्वाचा ठरणार असल्याने शेतकऱ्यांचे लक्ष हवामानाकडे लागले आहे. या प्रणालीमुळे मान्सूनची परतीची प्रक्रिया लांबण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे, मात्र याबाबत अंतिम निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. भारतीय हवामान विभागाच्या अधिकृत अंदाजाकडे लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## हिंगोलीत ‘राजकीय कनेक्शन’ असलेल्या जुगार अड्ड्यावर डीआयजी उमाप यांच्या पथकाची धाड; १८ जणांविरुद्ध कारवाई

### १८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस पथक हिंगोली जिल्ह्यात पाठविले होते. या पथकाने सत्ताधारी आमदाराचे ‘राजकीय कनेक्शन’ असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून १८ जणांविरुद्ध कारवाई केली आहे.

सदर पथकाने दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, हिंगोली शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, अजिंक्य सुदामराव नागरे याच्या कॉम्प्लेक्समधील पत्र्याचे



गाळ्यात छापा टाकला असता, सदर ठिकाणी उपस्थित असणारे लोक, पैसे लावून झन्ना– मन्ना नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याकडील, उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता, सदर ठिकाणी दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट, जिल्हा ठाणे यांचे लायसेन्सचे नावाखाली झन्ना–मन्ना नावाचा जुगार खेळला जात असल्याचे व तो अजिंक्य सुदामराव नागरे यांच्या मार्फत खेळविला जात असल्याचे पथकास आढळून आले.

सदर कारवाईत पोलिसांनी अब्दुल जावेद अब्दुल हमीद, निनाजी दशरथ कार्डेलकर, विनोद दत्तराव पांढरे, फारुख बेग खालीद बेग, निलेश पंडीत देशमुख, दिनकर लिंबाजी बांगर, म दनलाल गंगाप्रसाद जयस्वाल, गजानन सोपान गिते, मनोज विश्वनाथ गायकवाड, सुनील सुदाम लोखंडे, संतोष बळीराम कांदे, नागोराव जनार्धन काळे, शिवाजी राजाराम कठारे, आकाश कैलास तारे, धनाजी रामकिशन दहातोंडे आणि सतिष नामदेवराव मुसळे संबंधितांकडून २ लाख १६ हजार २० रुपयांची रोकड, १५ मोबाईल, १ चारचाकी वाहन व ८ मोटार सायकली असा एकूण १८ लाख ४७ हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत, हिंगोली शहर पोलीस ठाणे येथे गु. र.न. ६९१/२०२६ कलम ४, ५ मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्याचा तपास हिंगोली शहर पोलीस ठाण्यातील सपोनि बनसोडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## राज ठाकरेंचा डीजेला विरोध, डॉल्बी अन् दहीहंडीत महिला नाचवण्यावरुन परखडपणे सुनावले

**मुंबई (प्रतिनिधी)** – डीजे, डॉल्बी आणि सणांच्यावेळी कार्यक्रमां–मध्ये महिला नाचवणे ही उत्तरेची संस्कृती आहे. आपण ती आपल्या सणांमध्ये का आणत आहोत, असा सवाल मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

या मुद्द्यावरुन राज ठाकरे यांनी एकप्रकारे डीजे, डॉल्बी म्हणजेच सण आणि संस्कृती अशी भूमिका मांडणाऱ्या राजकारणी आणि संबंधितांना खडे बोल सुनावले आहेत. सण साजरे करा. कसले डॉल्बी आणि डीजे लावता. आपल्या पारंपरिक पद्धतीने सण का साजरा होत नाही? इतक्या श्रद्धेने तो गणपती घरी आणायचा आणि विसर्जन करताना नाचायचं, कसला आनंद होतो? माझ्या घरी दीड दिवसांचा गणपती येतो. ज्यावेळेला जो आपण



घेऊन जातो, त्यावेळी ओकंबोकं वाटतं घरं, उत्साह गेल्यासारखं वाटतं, वाईट वाटतं. त्याचा आनंद कसला व्यक्त करतो आपण, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

## माझ्या सख्ख्या चुलत भावाचा गतवर्षी डीजेमुळे मृत्यू झाला; मंत्री मेघना बोर्डीकरांनी गणेशोत्सवाबाबत मांडली परखड भूमिका

**धाराशिव (प्रतिनिधी)** – पुण्यात गणेशोत्सवात डीजे वाजवण्यावरुन सध्या चांगलाच वाद सुरू असून सजग नागरिक असलेल्या विद्यानंद बापट यांच्या भूमिकेचं कौतुक होत आहे. विद्यानंद बापट यांनी ठोकपणे आपली भूमिका मांडताना, सार्वजनिक उत्सवातील ध्वनीप्रदुषणाला विरोध केला आहे. बापट हे नास्तिक असल्याने त्यांच्या भूमिकेवरुन वाद निर्माण होऊन त्यांना मारहाणही करण्यात आली. आमच्या हिंदूंच्या सणालाच विरोध का, असाही सूर काहींनी उमटवला. मात्र, पुणेकर सांस्कृतिक पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करतील असे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले. आता, मंत्री मेघना बोर्डीकर यांनीही डीजेला थेट विरोध केला आहे.

आमदार बसवराज पाटील यांच्याकडून आयोजित कार्यक्रमा–साठी मेघना बोर्डीकर धाराशिवमध्ये आल्या होत्या, त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. डीजेच्या आवाजामुळे माझ्या सख्ख्या चुलत भावाचा गेल्यावर्षी गणपतीत मृत्यू झाला. सुप्रीम कोर्टाने डीजे बंदी केल्यानंतरही आपल्याला ते मान्य नसतं. सण–उत्सव साजरे करत असताना आपण काही मर्यादा घालायला हव्यात, असे मत मंत्री मेघना बोर्डीकर यांनी व्यक्त केलं. डीजे बंदीवर बोलताना आपल्या भावाच्या दुर्दैवी मृत्यूची आठवण देखील त्यांनी सांगितली. त्यामुळे, सरकारमधील मंत्री महोदयांनीही डीजे वाजवण्यावरुन आणि ध्वनीप्रदुषणावरुन एकप्रकारे बापट यांची भूमिका योग्यच असल्याचं सूचवलं आहे.

मराठवाड्यातल्या दुष्काळी परिस्थितीवरही मेघना बोर्डीकर यांनी भाष्य केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, योग्यवेळी योग्य निर्णय घेतील असं बोर्डीकर यांनी म्हटलं. तसेच, मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत मंत्रिमंडळाची समिती चर्चा करत आहे, त्यांच्या मागण्याबाबत योग्य तोडगा निघेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## ज्युनियर महिला हॉकी आशिया कपमध्ये भारताचा सलग दुसरा विजय

**मोकी (वृत्तसंस्था)** –भारताच्या ज्युनियर महिला हॉकी संघाने दुसऱ्या एलिट पूल सामन्यात मलेशियाला ११–१ ने पराभूत करत एएचएफ ज्युनियर आशिया कप २०२६ मधील आपली विजयी मालिका कायम ठेवली.

भारतीय संघ आता ८ सप्टेंबर रोजी तिसऱ्या पूल सामन्यात जपानचा सामना करेल. पहिल्या सामन्यात दक्षिण कोरियाला ४–१ ने हरवल्यानंतर, दोन वेळच्या विजेत्या आणि गतविजेत्या संघाने या सामन्यात अधिक आत्मविश्वास आणि समन्वय दाखवला. भारतासाठी सात वेगवेगळ्या खेळाडूंनी गोल केले. भारतीय खेळाडूंनी जोरदार आक्रमण केले आणि पेनल्टी कॉर्नरचा प्रभावीपणे वापर केला. सामन्याच्या पहिल्याच मिनिटात भारताने गोल करून खाते उघडले. पूजा साहूने पेनल्टी स्ट्रोकचे गोलमध्ये रूपांतर करून संघाला १–० अशी आघाडी मिळवून दिली. चौथ्या मिनिटात पूर्णिमा यादवने आघाडी २–० अशी वाढवली. त्यानंतर आठव्या मिनिटात बिनिमा धनने गोल केला, तर १४ व्या मिनिटात कृष्णा शर्माने भारताची आघाडी ४–० अशी वाढवली.


## औषध निरीक्षक पेपरफुटीत सहभाग आढळल्यास कठोर शिक्षा होईल; मुख्यमंत्री फडणवीसांचा विद्यार्थ्यांना शब्द

**मुंबई (प्रतिनिधी)** –देशातील नीट पेपरफुटीनंतर देशभरात मोठं आंदोलन झाल्याचं पाहायला मिळालं, दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनास देशभरातून पाठिंबा मिळाल्याने अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आला. मात्र, त्यानंतरही महाराष्ट्रात सीईटी आणि एमपीएससी पेपरफुटीच्या घटना घडल्या. सर्वात पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा म्हणून एमपीएससीकडे पाहिले जाते. मात्र, एमपीएससीच्या औषध निरीक्षकपदासाठीचा पेपर फुटल्याने पुन्हा एकदा पेपरफुटी चव्हाट्यावर आली.

यानंतरणी, पोलिसांनी आत्तापर्यंत ६ हून अधिक आरोपींना अटक केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थी शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली.



एमपीएससी परीक्षा पद्धती संदर्भात स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी, विद्यार्थ्यांनी काही मागण्या केल्या. यामध्ये शिक्षक सचिन ढवळे, यशवंत सोलाट, धनंजय मते, गणेश कड, उमेश कुदळे, विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते निखिल पाटील यांच्यासह स्पर्धा परीक्षा शिक्षक–विद्यार्थी उपस्थित होते.




## जगाच्या नवीन नकाशावर भारताचा आक्षेप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारताने जगाच्या नवीन नकाशाबद्दल आक्षेप घेतला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी सांगितले की, जम्मू–काश्मीर आणि लडाखसह भारताचा संपूर्ण प्रदेश भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दिसला पाहिजे. भारताचा प्रदेश चुकीच्या किंवा दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने दाखवणे त्याला मान्य नाही.

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, भारताने संयुक्त राष्ट्रच्या त्या प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले आहे, ज्यात जगाच्या नकाशावर देश आणि खंडांचा आकार त्यांच्या वास्तविक क्षेत्रफळाच्या जवळ दाखवण्याची गोष्ट सांगितली आहे. तथापि, भारताने स्पष्ट केले की याचा अर्थ कोणत्याही एका विशिष्ट नकाशाला मान्यता देणे नाही.

खरेतर, संयुक्त राष्ट्र महासभेने शुक्रवारी जगाचा नकाशा नवीन पद्धतीने दाखवण्याचा प्रस्ताव मंजूर केला. या बदलामुळे कोणत्याही देश किंवा खंडाचे वास्तविक क्षेत्रफळ बदलणार नाही. फक्त नकाशावर त्यांचा आकार पूर्वीपेक्षा काहीसा लहान किंवा मोठा दिसेल.

सध्या जगात मर्केटर नकाशाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. यात नकाशावर ध्रुवांजवळील प्रदेश त्यांच्या मूळ आकारापेक्षा मोठे दिसतात. नवीन पद्धतीला ‘इक्वल एरिया प्रोजेक्शन’ असे म्हटले आहे. यात आफ्रिका पूर्वीपेक्षा मोठा, तर युरोप आणि उत्तर अमेरिका लहान दिसतील. आशियाचे काही भागही पूर्वीच्या तुलनेत लहान दिसू शकतात.

## केंद्रीय कायदेमंत्र्यांचा महत्त्वाचा निर्णय, मुंबई, दिल्लीसह देशभरातील ८ उच्च न्यायालयांमध्ये मोठे बदल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने शिफारस केल्यानंतर काही दिवसांतच, शनिवारी देशभरातील आठ उच्च न्यायालयांमध्ये नवीन मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ‘एक्स’ (द) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टद्वारे या नियुक्त्यांची घोषणा केली. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश न्यायमूर्ती वल्लुरी कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आता कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील.

छत्तीसगड उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. तर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अश्वनी कुमार मिश्रा यांची त्याच उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तिकडे ओडिशा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्ण राम महापात्रा यांची छत्तीसगड उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गुजरात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अल्पेश यशवंत कोगजे यांची मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पुष्पेंद्र सिंह भाटी यांची जम्मू आणि काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ‘एक्स’ (द) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टद्वारे या नियुक्त्यांची घोषणा केली.

राजस्थान उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश संजीव प्रकाश शर्मा यांच्याभोवती अलीकडेच वाद निर्माण झाला होता. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी त्यांच्यावर गंभीर आणि अभूतपूर्व आरोप केले होते. दरम्यान, न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या नव्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# पिढीच्या भवितव्याचा प्रश्न?

'नशामुक्त महाराष्ट्र'चा संकल्प कागदावर आणि व्यसनाचा विळखा वास्तवात, अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. विशेषतः नांदेड शहर आणि जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नशेच्या गोळ्या, व्हाइटनर आणि विविध पदार्थांचा गैरवापर होत असल्याचे प्रकार समोर येत असतील, तर या समस्येकडे केवळ जनजागृतीच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. प्रश्न विद्यार्थ्यांना व्यसनापासून कसे दूर ठेवायचे, यापुरता मर्यादित नाही; त्यांच्या हातात नशेचे साहित्य पोहोचते तरी कुठून? विद्यार्थ्यांना नशा-मुक्तीची शपथ देणे, व्यसनाचे दुष्परिणाम सांगणे, समुपदेशन करणे, कार्यशाळा घेणे हे निश्चितच आवश्यक आहे. विविध शैक्षणिक संस्थांमध्ये मानसोपचार तज्ज्ञांच्या कार्यशाळाही घेतल्या जात आहेत. अशा उपक्रमांचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, शपथ घेतल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आवाक्यातच नशेचे साहित्य उपलब्ध असेल, तर त्या शपथेचे भवितव्य काय? व्यसनमुक्तीची लढाई फक्त विद्यार्थ्यांविरुद्ध नसून नशेच्या बाजाराविरुद्ध असली पाहिजे. एखादा विद्यार्थी व्यसनाच्या आहारी गेला म्हणून त्याच्यावर दोषारोप करणे सोपे आहे. पण त्याच्यापर्यंत नशेची वस्तू पोहोचवणारा कोण, ती कुठून येते, कोण विकतो, कोण साठवतो, कोण वाहतूक करतो आणि या सगळ्यामागे आर्थिक सूत्रधार कोण आहेत, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे. सेवन करणारा हा साखळीतील शेवटचा दुवा असतो; खरा गुन्हेगार अनेकदा या साखळीच्या वरच्या स्तरावर असतो. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात संशयास्पद हालचाली होत नाहीत का? विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होणाऱ्या पदार्थांच्या विक्रीवर लक्ष ठेवले जाते का? प्रतिबंधित किंवा नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या विक्रीची नियमित तपासणी होते का? पोलीस, शिक्षण विभाग, स्थानिक प्रशासन आणि शैक्षणिक संस्था यांच्यात प्रभावी समन्वय आहे का? या प्रश्नांची ठोस उत्तरे समाजाला मिळाली पाहिजेत. नांदेड पोलीस प्रशासनाने प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रमुखांना शाळा-महाविद्यालयांमध्ये व्यसनविरोधी जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत आणि अमली पदार्थ पुरवठादारांवर कारवाई सुरू असल्याचे सांगितले आहे. ही भूमिका स्वागतार्ह आहे. परंतु जनजागृतीसोबत कारवाईची आकडेवारीही सार्वजनिक झाली पाहिजे. अमली पदार्थविरोधी पथक नेमके किती सक्रिय आहे? गेल्या काही काळात किती कारवाया झाल्या? किती गुन्हे दाखल झाले? किती पुरवठादार पकडले गेले? किती प्रकरणांत तपास पुरवठ्याच्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचला? शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात किती तपासण्या करण्यात आल्या? या प्रश्नांची उत्तरे केवळ पोलीस प्रशासनासाठी नव्हे, तर पालक आणि समाजासाठीही महत्त्वाची आहेत. कारण नशेचा व्यापार हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. तो पुढील पिढीच्या भवितव्याचा प्रश्न आहे. व्यसनामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य, मानसिक स्थैर्य, कौटुंबिक संबंध आणि सामाजिक आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. त्यामुळे क्रीडा, कौशल्यविकास, करिअर मार्गदर्शन, समुपदेशन आणि सकारात्मक सामाजिक उपक्रमांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पण त्याचवेळी प्रशासनाने एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, नशामुक्तीच्या नावाखाली केवळ शपथविधी आणि जनजागृतीचे फोटो प्रसिद्ध करून प्रश्न सुटणार नाही. विद्यार्थ्यांच्या हातात नशेचे साहित्य पोहोचू नये, यासाठी त्याच्या पुरवठ्याची साखळीच तोडावी लागेल. 'नशामुक्त महाराष्ट्राचा' संकल्प खरा असेल तर त्याची सुरुवात घोषणांपासून नव्हे, तर नशेच्या बाजाराच्या मुळावर घाव घालण्यापासून झाली पाहिजे. अन्यथा व्यासपीठावर शपथा घेतल्या जातील, कार्यशाळा होतील, भाषणे होतील; आणि त्याच वेळी कुठल्यातरी अंधाऱ्या कोपऱ्यातून पुढच्या पिढीच्या हातात नशेची पुडी पोहोचत राहील. ही विसंगती थांबवण्याची जबाबदारी आता प्रशासनाने गांभीर्याने स्वीकारली पाहिजे.

# राजे उमाजी नाईक : स्वराज्याची ज्वाला

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या राजकीय नेत्यांच्या कार्याचा इतिहास नाही. या इतिहासाच्या पाठीशी असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्ती, समाजघटक, कष्टकरी आणि वंचित जनसमुदायांच्या त्यागाची, संघर्षाची आणि स्वाभिमानाची परंपरा उभी आहे. परकीय सत्तेविरुद्धचा असंतोष देशाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत होता. महाराष्ट्राच्या भूमीतही ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराला प्रारंभीच विरोध करणाऱ्या अनेक धाडसी व्यक्तींनी आपल्या परीने प्रतिकार उभारला. या आरंभीच्या ब्रिटिशविरोधी संघर्षातील एक महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजे उमाजी नाईक. ७ सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका शूर व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे, तर स्वाभिमान, स्वराज्य, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभे राहण्याच्या मूल्यांचे स्मरण करणे होय.

राजे उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी (पुरंदर किल्ला) येथे झाला. त्यांचे वडील दादाजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीशी संबंधित होते. त्या काळात रामोशी समाजातील अनेक कुटुंबांवर किल्ल्यांची राखण, रात्रीची गस्त, पहारा आणि सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात. या पारंपरिक कामामुळे या समाजातील लोकांमध्ये धैर्य, शारीरिक कणखरपणा, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि परिसराची सूक्ष्म माहिती असण्याचे कौशल्य विकसित झाले होते. उमाजी नाईक यांचे बालपणही अशाच वातावरणात गेले. तलवार, भाला, कुऱ्हाड, धनुष्यबाण, गोफण आणि दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांच्या वापराचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साहसाबरोबरच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.

उमाजी नाईक यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी परिस्थिती ब्रिटिश सत्तेच्या विस्तारामुळे निर्माण झाली. ईस्ट



इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील राजकीय आणि प्रशासकीय वर्चस्व वाढविल्यानंतर पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि स्थानिक व्यवस्था विस्कळीत होऊ लागल्या. अनेक समाजघटकांचे पारंपरिक अधिकार आणि उपजीविकेची साधने हिरावली जाऊ लागली. रामोशी समाजालाही या बदलाचा मोठा फटका बसला. पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीसारख्या पारंपरिक जबाबदाऱ्यांपासून त्यांना दूर करण्याचे प्रयत्न झाले. वतने, जमिनी आणि पारंपरिक अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे केवळ आर्थिक प्रश्न निर्माण झाला नाही, तर समाजाच्या स्वाभिमानालाही धक्का बसला. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार अचानक परकीय सत्तेच्या निर्णयामुळे संपुष्टात येत असल्याची भावना उमाजी नाईक यांच्या मनात तीव्र झाली.

या परिस्थितीत उमाजी नाईकांनी अन्याय स्वीकारण्याऐवजी प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशी समाजातील अनेक लोक एकत्र आले. मात्र त्यांचा संघर्ष केवळ एका समाजाच्या तक्रारींपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक जनतेवर होणारे आर्थिक शोषण, अन्याय आणि अधिकारशाली घटकांकडून होणारी पिळवणूक यांच्याविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. सावकार, जमीनदार आणि सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या घटकांविषयी त्यांचा रोष होता. त्यामुळे त्यांच्या संघर्षामध्ये राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक न्यायाची आकांक्षाही दिसून येते. तत्कालीन ग्रामीण समाजातील विषमता आणि असुरक्षितता लक्षात घेतल्यास उमाजी नाईकांच्या नेतृत्वामागे सामान्य लोकांच्या असंतोषाची मोठी पार्श्वभूमी होती.

उमाजी नाईकांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वराज्याची त्यांची कल्पना. त्यांनी स्वतःला 'राजे' म्हणून संबोधले आणि ब्रिटिशांच्या प्रशासकीय सत्तेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी त्यांनी न्यायनिवाड्याची व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. १८२७ मध्ये त्यांच्या जाहीर आवाहना-तून ब्रिटिशांच्या महसूलव्यवस्थेला सहकार्य न करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध उभे राहण्याचा संदेश देण्यात आला. ही भूमिका त्या काळातील परिस्थितीत अत्यंत धाडसी होती. ब्रिटिश सत्ता हळूहळू आपले प्रशासकीय जाळे मजबूत करत असताना तिच्या महसूलव्यवस्थेला विरोध करणे म्हणजे त्यांच्या शासनव्यवस्थेच्या मुळालाच आव्हान देणे होते.

१८३१ मधील उमाजी नाईकांचा जाहीरनामा त्यांच्या राजकीय विचारांच्या व्यापकतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानला जातो. या आवाहनातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक प्रतिकार उभारण्याची भूमिका स्पष्ट होते. ब्रिटिशांना महसूल देऊ नये, त्यांच्या सत्तेला सहकार्य करू नये आणि आपल्या भूमीच्या स्वाधिकारासाठी संघर्ष करावा, असा त्यामागील संदेश होता. विशेष म्हणजे या आवाहनाचा विस्तार एका समाजापुरता किंवा एका गावापुरता मर्यादित नव्हता. हिंदुस्थाना-तील विविध घटकांनी एकत्र येऊन परकीय सत्तेविरुद्ध उभे राहावे, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना त्या काळात आजच्या अर्थाने विकसित झालेली नसली तरी परकीय सत्तेविरुद्ध व्यापक जनप्रतिरोधाची कल्पना त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. म्हणूनच उमाजी नाईकांच्या कार्याचा अभ्यास केवळ स्थानिक बंड किंवा उठाव म्हणून न करता भारतीय स्वातंत्र्याच्या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.

ब्रिटिश प्रशासनाने उमाजी नाईकांना पकडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्यात आले. अखेरीस ८ ऑगस्ट १८३१ रोजी त्यांच्या पकडीसाठी दहा हजार रुपयांचे मोठे बक्षीस आणि चारशे बिघे जमीन देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेवरून उमाजी नाईक ब्रिटिश प्रशासनासाठी किती मोठे आव्हान ठरले होते, याची कल्पना येते. दीर्घकाळ त्यांचा शोध घेतल्यानंतर विश्वास-घातामुळे त्यांना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. १५ डिसेंबर १८३१ रोजी उमाजी नाईक ब्रिटिशांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

३ फेब्रुवारी १८३२ रोजी पुण्यात उमाजी नाईकांना फाशी देण्यात आली. एका तरुण वयात सुरू झालेला त्यांचा संघर्ष अशा प्रकारे संपला; परंतु त्यांच्या बलिदानाने निर्माण केलेली प्रेरणा संपली नाही. उलट त्यांच्या मृत्यूनंतरही ब्रिटिशविरोधी प्रतिकाराच्या इतिहासात त्यांचे नाव कायम राहिले. १८५७ च्या व्यापक उठावापूर्वीच भारताच्या विविध भागांत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष आणि प्रतिकाराची विविध रूपे दिसत होती. महाराष्ट्रातील या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेत उमाजी नाईकांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ उच्चभ्रू किंवा राजकीय नेतृत्वापुरती मर्यादित नव्हती; ती सामान्य लोकांच्या मनातही खोलवर रुजलेली होती.

उमाजी नाईकांच्या जयंतीचे महत्त्व म्हणूनच केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण करण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनातील स्वाभिमान, धैर्य, संघटनशक्ती आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांनी इतिहासाकडे केवळ गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्या सामाजिक परिस्थितीत एखादा संघर्ष निर्माण झाला, त्यामागे कोणते आर्थिक आणि राजकीय घटक होते, सामान्य लोकांची भूमिका काय होती आणि त्या संघर्षातून पुढील समाजाला काय शिकता येते, याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासातून इतिहास जिवंत होतो आणि वर्तमानाला दिशा देण्याची क्षमता त्याला प्राप्त होते.

७ सप्टेंबरला राजे उमाजी नाईक जयंती साजरी करताना म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच समाजातील अन्याय आणि विषमता कमी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्वाभिमानाची ज्योत ज्ञानाने अधिक प्रखर करणे, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणे, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. उमाजी नाईकांनी परकीय सत्तेविरुद्ध पेटविलेली प्रतिकाराची ज्वाला आज संविधानिक मूल्यांच्या प्रकाशात पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या स्मृतीतून धैर्य घ्यावे, त्यांच्या संघर्षातून स्वाभिमान शिकावा आणि त्यांच्या जीवनातून न्याय्य समाजनिर्मितीची प्रेरणा घ्यावी. इतिहासातील त्यांचे स्थान केवळ भूतकाळात नाही; अन्यायाविरुद्ध जागृत राहणाऱ्या प्रत्येक पिढीच्या वर्तमानात आणि भविष्यातही राजे उमाजी नाईकांची स्वराज्याची हाक निनादत राहील.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# दहीहंडी आणि मराठी-हिंदी गाणी

उंचच उंच बांधल्या जाणाऱ्या दहीहंडी, त्यासाठी ठेवण्यात येणारे भलेमोठे बक्षीस व त्या बक्षिसासाठी एकावर एक थर रचत हंडी फोडण्यासाठी सुरु असलेली गोविंदा पथकातील चढाओढ प्रेक्षकांना रोमांचक वाटते. यासोबतच गोविंदा पथके हिंदी आणि मराठी चित्रपटातील पुढील गाण्यांवर थिरकताना आपल्याला दिसतात.

गोविंदा आला रे आलाजरा मटकी संभाल बृजबाला दहीहंडीवर चित्रित झालेली सगळी गाणी अशी ही चालीत म्हणायला लावणारी! ताल धरायला लावणारी! नुसती कानावर पडली की थिरकायला ला-वणारी. अशाच काही गाण्यांची उजळणी आज आपण करणार आहोत.

१९६३ साली प्रदर्शित झालेल्या ब्लफमास्टर या चित्रपटातील गोविंदा आला रे आला हे गाणं आजही प्रत्येकाच्या मनात एक वेगळ्या उंचीवर आहे. मोहम्मद रफी यांच्या आवाजातील आणि शम्मी कपूर यांच्या वर चित्रित झालेलं हे गाणं दहीहंडीच्या दिवशी ऐकताना एक वेगळाच जोश संचारतो.

हो कैसी निकली है झूम के ये टोली
आज खेलेगी दूध से ये होली

किती सुंदर शब्दरचना दुधाने होळी खेळणं ही कल्पनाच किती गोड आहे. या गाण्याचे अजरामर झा-लेले बोल राजेंद्र कृष्णन यांनी लिहीले होते.

१९८९ साली प्रदर्शित झालेला मराठी चित्रपट 'हमाल दे धमाल' या चित्रपटातील गोविंदा रे गोपाला हे लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यावर चित्रीत झालेलं गाणं आजही अव्वल स्थानावर आहे.

खिडकीतल्या ताई अक्का अशा वाकू नका,
पुढं वाकू नका, दोन पैसे देतो मला भिजवून टाका म्हणत लक्ष्याने हमाल दे धमाल चित्रपटातील या गाण्यात अक्षरशः धमाल उडवून दिली होती. आजही दहीहंडी खेळताना ढाक्कूमाकूमढाक्कूमाकूम. गोविंदा रे गोपाळा हे बोल ऐकू आल्यावर लक्ष्याची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

लाल लाल पागोटे गुलाबी शेला,
चिंट्या दादा गेला, जीव झाला वेडा
या ओळी असतील किंवा

एक दोन तीन चार हमालपुऱ्यातली पोरं हुशार या ओळी. अशोक हांडे यांनी गायलेल्या या गाण्याने व लक्ष्याच्या नृत्याने लोकप्रियतेचे सर्वोच्च शिखर गाठले होते.

दहीहंडी उत्सव हा आपल्याकडे एखाद्या खेळाप्रमाणे खेळला जातो. बरीच गोविंदा पथक यात सहभागी होतात. दहीहंडी फोडण्यासाठी स्पर्धा असते, चढाओढ असते. हेच सगळं पडद्यावर दाखवणारी गाणं आठवतात.

मोरयाचित्रपटातील संतोष जुवेकर आणि चिन्मय



मांडलेकर यांच्यावर चित्रित करण्यात आलेलं गाणं.

''गोविंदा रे गोपाळागोविंदा रे गोपाळा
यशोदेच्या तान्ह्या बाळा गोविंदा रे गोपाळा
आला रे आला, गोविंदा आला.
गवळणींच्या पोरींनो जरा मटकी संभाळा
दोन्ही गटातील दहीहंडीचा अटीतटीचा
सामना पाहायला आणि ऐकायला छान वाटतो.
कधी हातात हात, कधी पायात पाय,
अरे खांदयावर घेणार पण डोक्यावर न्हाय. असे हे सुंदर गाण्याचे बोल आहेत. दहीहंडी आमचीच टीम फोडणार अशी अशा बाळगून सगळेच नाचताना व गाताना दिसून येतात.

काळानुसार बदललेला गोविंदा सुद्धा आता डॅशिंग झालाय. २०१६ साली प्रदर्शित झालेल्या 'वृंदावन' या चित्रपटातील हे गाणं पूजा सावंत, राकेश बापट आणि वैदेही परशुरामी या तिघांवर चित्रित करण्यात आलं आहे.

ताशांच्या आणि ढोलांच्या तालावर सजलेलं, आला रे आला डॅशिंग गोविंदा, चंगा है बंदा डॅशिंग डॅशिंग गोविंदा हे गाणं अवधूत गुप्ते यांनी गायलं असून याचं संगीत मात्र अमितराज यांनी दिलेलं आहे.

काळ बदलत गेला तरी काही गोष्टी अजिबात बदलल्या नाहीत. पूर्वीचा तरूण वर्ग दहीहंडी साठी जेवढा उत्साही असायचा तेवढाच आजचाही आहे. आधुनिक तंत्रज्ञान आलं किंवा मनोरंजनाची साधनं आली तरी आजचा तरुण सुद्धा दहीहंडी दिवशी थरावर थर लावून गोपाळकाला खेळतोच. आजच्या पिढीचं प्रतिनिधित्व करणारा मध्यंतरी कान्हा म्हणून एक मराठी चित्रपट आला होता.

आता नावंच 'कान्हा' म्हटल्यावर दहीहंडी वर चित्रित गाणं नाही, असं कसं होईल.? २०१६ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातील कृष्ण जन्मला हे गाणं बरंच लोकप्रिय झालं.

ढगांच्या आडून चंद्र हासला
आकाशी ता-यांनी रास रंगला.
कृष्ण जन्मला बाई कृष्ण जन्मला
कृष्ण जन्मला बाई कृष्ण जन्मला

वैभव तत्ववादी आणि गश्मीर महाजन याच्यावर चित्रित झालेल्या या गाण्याचं संगीत अवधूत गुप्ते यांनी दिलं आहे. अवधूत गुप्ते, सोनू कक्कर आणि वैशाली सामंत यांनी गायलं आहे. आणि मंदार चोळकर यांच्या लेखणीतून हे सुंदर बोल असलेलं गाणं अवतरलेलं आहे.

श्रीकृष्णाच्या जन्मा-निमित्ताने, जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडी हा सण भारतभर, भारताबाहेर मोठ्या धुमधडाक्यात साजरी केला जातो. दहीहंडी हा नुसता शब्द उच्चारला तरी उत्साहाला उधाण येतं. आणि हा उत्साह वाढवण्याचं काम करत असतात ती लाऊडस्पिकर वर वाजणारी गाणी. शोर मच गया शोर देखो आया माखन-चोर हे किशोर कुमार यांच्या आवाजातील गाणं तर हम खास लावलं जातं.एक दो तीन चार, राजू दादा के चेले होशियार अशी सुरुवात असलेल्या या गाण्यात शत्रुघ्न सिन्हा यांनी याजेवढी धमाल केली आहे तेवढीच धमाल हे गाणं ऐकून आताचे गोविंदा दहीहंडी फोडताना करतात. १९७४ साली प्रदर्शित झालेल्या 'बदला' या चित्रपटातील हे गाणं आनंद बक्षी यांनी लिहीलं होतं आणि या आपलं भाग्य म्हणावं लागेल की या गाण्याला संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचं मिळालं होतं.

हल्ली दहीहंडी दिवशी प्रत्येक शहरात, गावा-गावांत, चौका-चौकांत दही हंडीचे थर लावून ती फोडली जाते. आणि जोडीला असतात मोठमोठ्या आवाजात वाजणारे डॉल्बी स्पीकर. याच स्पीकर वर अजून एक गाणं ऐकायला मिळतं ते म्हणजे अमिताभ बच्चन यांचं मच गया शोर सारी नगरी रे, आया बिरज का बाँका, संभाल तेरी गगरी रे...

१९८२ साली प्रदर्शित झालेल्या खुद्दार या चित्रपटातील अमिताभ यांच्या वर चित्रित झालेलं हे गाणं किशोर कुमार यांनी गायलं होतं. प्रत्येक गोविंदाला ठेका धरायला लावणारं हे गाणं आजही लोकप्रिय आहे.

बऱ्याच हिंदी मराठी चित्रपटांमधून दहीहंडी हा सण साजरा करताना आपण बघतो, त्यावर चित्रित झालेलं गाणं तर हमखास असतंच. चाँदी की डाल पर सोने का मोर, सोने का मोर..

ताक झांक ताक करे नीचे का चोर हे असंच एक गाणं. १९९९ साली प्रदर्शित झालेल्या हेलो ब्रदर या चित्रपटातील गाण्याला लोकांनी डोक्यावर घेतलं होतं. सलमान खानचा स्वतःचा चाहतावर्ग वाढत असताना हे गाणं आलं होतं. सलमान खान आणि राणी मुखर्जी यांच्यावर चित्रित झालेलं हे गाणं खुद्द सलमान खान ने गायलं आहे. सोबत अलका यागनिक यांचा आवाज आहे. संगीत दिलं होतं हिमेश रेशमिया यांनी.

आज हम लोग मस्ती करेगा!

असंच एक गाणं म्हणजे संजय दत्त याच्या वास्तवमधील गाणं. बरोबर ओळखलंत!

हर तरफ है ये शोर, आया गोकुल का चोर
आज हम लोग मस्ती करेगा!

हेच ते गाणं. तुझ्या घरात नाही पाणी घागर उताणी रे गोपाळा.अशा मराठी शब्दांनी सुरूवात होणारं हे गाणं कोणाला माहीत नाही तर नवलच.

नव्वदच्या दशकातील मुंबई, आणि अंडरवर्ल्डचं पसरत चाललेलं साम्राज्य. असा तो काळ. १९९९ साली प्रदर्शित झालेल्या वास्तव ने एक इतिहास घडवला होता. जतिन ललित यांचं संगीत असलेलं हे गाणं अतुल काळे आणि विनोद राठोड यांनी गायलं होतं. मराठी असो वा हिंदी. दहीहंडी वर चित्रित झालेलं प्रत्येक गाणं लोकप्रिय झालं आहे. २०१२ साली आलेला ओह माय गॉड या चित्रपटातील गो गो गोविंदा हे गाणं सुद्धा असंच. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच ताल धरायला लावणारं. कारण मिका सिंग आणि श्रेया घोशाल यांनी गायलेल्या या गाण्यावर ताल धरलाय तो खुद्द प्रभू देवा याने. आता प्रभू देवा यांचा डान्स बघणं म्हणजे डोळ्यांना पर्वणी असते. या गाण्याने बेस्ट कोरिओग्राफी चे वॉर्ड सुद्धा मिळवले होते. यापैकी तुमचं आवडीचं गाणं किंवा तुम्हाला सुचलेलं गाणं कोणतं ते मला नक्कीच प्रतिक्रियेमधून सांगा.

महाराष्ट्रात दहीहंडीचा उत्साह व जल्लोष अवर्णनीय असतो.पण भलेमोठे बक्षीस व त्या बक्षिसासाठी एकावर एक थर रचत हंडी फोडण्यासाठी सुरु असलेली गोविंदा पथकातील चढाओढ प्रेक्षकांना रोमांचक वाटत असली तरी हंडी फोडण्यासाठी शेवटच्या थरावर असलेल्या गोविंदाचा जीव धोक्यातच असतो. याचे भान ठेवून हा उत्सव सर्व दक्षता घेऊनच साजरा करावा. श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी च्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

**-रूचिरा बेटकर,**
नांदेड.
मो. ९९७०७७४२११

# नांदेड शहर हरित बनवूया...

नांदेड हे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व असलेले शहर आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहरीकरणामुळे प्रदूषण व पर्यावरणाचा ऱ्हास वाढत आहे. त्यामुळे नांदेड शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित बनवणे ही काळाची गरज आहे. हरित शहरासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात झाडे लावणे व त्यांची नियमित काळजी घेणे आवश्यक आहे. रस्त्यांच्या दुतर्फा, शाळांच्या परिसरात, उद्यानांमध्ये आणि मोकळ्या जागांवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले पाहिजे. तसेच प्लास्टिकचा वापर कमी करून कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहरासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन किमान एक तरी झाड लावावे व त्याचे संगोपन करावे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याची जबाबदारी स्वीकारली, तर नांदेड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि हिरवेगार होऊ शकते. शहरातील प्रदूषण



कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवला पाहिजे. पादचाऱ्यांसाठी, सायकलसाठी स्वतंत्र मार्ग, अधिक उद्याने आणि हिरवळ निर्माण केली पाहिजे. पाण्याची बचत करणे आणि सौरऊर्जेचा वापर वाढवणे यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल.

नांदेड शहराचा विकास होत असताना पर्यावरणाचे संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. वाढते प्रदूषण, उष्णता आणि कमी होत जाणारी हिरवाई यामुळे वृक्षलागवडीची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे नांदेड शहर हरित बनवूया यासाठी वृक्षलागवड कार्यक्रम राबवणे महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमाची सुरुवात शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, रस्त्यांच्या कडेला आणि मोकळ्या जागांवर रोपे लावून करता येईल. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रशासन यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे.

वृक्ष आपल्याला प्राणवायू देतात, प्रदूषण कमी करतात आणि वातावरण थंड ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे केवळ वृक्ष लावणे पुरेसे नसून त्यांची नियमित काळजी घेणे आणि संगोपन करणेही आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याची जबाबदारी स्वीकारली, तर नांदेड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि हिरवेगार होऊ शकते. वृक्ष हे पर्यावरणाचे रक्षण करणारे अमूल्य साधन आहेत. वृक्ष लागवड आणि वृक्षसंवर्धनामुळे शहरा-तील प्रदूषण कमी होऊन नागरिकांना निरोगी वातावरण मिळेल. म्हणून हा केवळ एक उपक्रम न राहता लोकचळवळ बनणे गरजेचे आहे.

वृक्षारोपण, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पाणी बचत आणि प्रदूषण नियंत्रण या उपायांमुळे नांदेड अधिक हिरवेगार व निरोगी बनू शकते. यासाठी प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वाची आहे. झाडे लावा, झाडे जगवा आणि नांदेड हिरवेगार बनवा हा संदेश प्रत्येक नागरिकाने आचरणात आणला पाहिजे. आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढीला निरोगी आणि सुंदर पर्यावरण देईल. चला, सर्वांनी मिळून नांदेड शहर हरित बनवूया.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# नगराध्यक्षांच्या स्वाक्षरीचा अधिकार शासनाकडून रद्द

## ● नमुना क्र. ६४ वर सही बंधनकारक नाही, नगरविकास विभागाने केले स्पष्ट
## ● शासनाच्या आदेशामुळे राजकीय समिकरणांना नवे वळण

**नांदेड (प्रतिनिधी)–** नगरपरिषदांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये नमुना क्र. ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे की नाही, याबाबत सुरू असलेल्या संभ्रमाला महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने स्पष्ट मार्गदर्शन देत महत्त्वाचा खुलासा केला आहे. शासनाच्या दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार, विद्यमान कायदेशीर तरतुदींचा विचार करता नगराध्यक्षांना वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर नियंत्रणाचा स्वतंत्र अधिकार अस्तित्वात नसल्याने लेखा संहितेतील नमुना क्र. ६४ वर मुख्याधिकाऱ्यांसमवेत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील संबंधित तरतुदी तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता आणि त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणांचा संदर्भ देत नगरविकास विभागाने हे मार्गदर्शन जारी केले आहे.

शासनाच्या पत्रानुसार, दि. २३ सप्टेंबर २०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे तयार करण्यात आलेल्या लेखा संहितेत नमुना क्र. ६४ वर मुख्याधिकाऱ्यांसमवेत नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर दि. २४ ऑगस्ट २०१५ रोजी लेखा संहितेत सुधारणा करण्यात आली. या अधिसूचनेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते आणि दि. १५ फेब्रुवारी २०१६ रोजी त्यास स्थगिती देण्यात आली होती.

दरम्यान, महाराष्ट्र अधिनियम क्र. २५, दि. ३१ मार्च २०१८ अन्वये मूळ अधिनियम आणि लेखा संहिता यामध्ये समानता आणण्यासाठी संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामध्ये नगराध्यक्षांच्या वित्तीय नियंत्रणाशी संबंधित काही तरतुदी वगळण्यात आल्या. परिणामी, दि. २४ ऑगस्ट २०१५ रोजीची अधिसूचना निष्प्रभ ठरते, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाशी संबंधित न्यायालयीन बाबींचाही शासनाने आपल्या पत्रात उल्लेख केला असून, दि. १६ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित प्रकरणांची सद्यस्थिती स्पष्ट करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ३१ मार्च २०१८ रोजीच्या सुधारणेला कोणत्याही न्यायालयीन प्रकरणात आव्हान देण्यात आलेले नसल्याचेही शासनाने नमूद केले आहे. त्यामुळे विद्यमान मूळ अधिनियमात नगराध्यक्षांना वित्तीय नियंत्रणाचा अधिकार नसल्याने नमुना क्र. ६४ वर नगराध्यक्षांची स्वाक्षरी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे नगरविकास विभागाचे म्हणणे आहे.

# 'नेत्रदान' महादानचा संदेश देत नांदेड शहरातून जनजागृती रॅली

## राष्ट्रीय नेत्रदान पंधरवाड्यानिमित्त लायन्स नेत्र रुग्णालयाचा उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** 'राष्ट्रीय नेत्रदान जनजागृतीतून अंधत्वावर मात' या संकल्पनेतून राष्ट्रीय नेत्रदान पंधरवा ड्यानिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व नंदीग्राम लॉयन्स ट्रस्ट नांदेड संचलित नेत्र रुग्णालय नांदेड यांच्या वतीने शहरातून भव्य नेत्रदान जनजागृती रॅली काढण्यात आली. 'नेत्रदान–महादान', 'मृत्यूनंतरही डोळ्यांतून दुसऱ्याच्या जीवनात प्रकाश निर्माण करा' अशा प्रभावी घोषवाक्यांनी नांदेड शहर दुमदुमून गेले. रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जंगमवाडी येथील लायन्स नेत्र रुग्णालयापासून रॅलीचा शुभारंभ लायन्स प्रांत ३२३४ एच २ चे प्रथम उपप्रांतपाल लॉयन योगेशकुमार जायस्वाल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी नागरिकांनी नेत्रदाना सारख्या मानवतावादी उपक्रमात सहभागी होऊन 'नेत्रदानमहादान' या संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन केले. नंदीग्राम नेत्ररुग्णालयाचे अध्यक्ष लॉयन. राजेश लोटिया, सचिव लॉयन.ड. प्रविण अग्रवाल, कोषाध्यक्ष लॉयन. अरुणकुमार तोष्णीवाल, उपाध्यक्ष लॉयन. गंगाप्रसाद तोष्णीवाल, सहसचिव लॉयन. शिरीष कासलीवाल यांच्यासह सर्व लॉयन्स क्लबचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, लॉयन्स नेत्र रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

जंगमवाडी येथून सुरू झालेली ही रॅली आयटीआय, शिवाजीनगर, कलामंदिर, हनुमान पेठ, महावीर चौक मार्गे जुना मोंढा टॉवर येथे पोहोचली. संपूर्ण रॅली दरम्यान सहभागींच्या हातातील नेत्रदान जनजागृतीचे फलक आणि घोषवाक्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले. नेत्रदाना बाबत असलेले गैरसमज दूर करून नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा संदेश रॅलीतून देण्यात आला.

पथनाट्यातून नेत्रदानाचा प्रभावी संदेश

रॅलीदरम्यान महात्मा फुले पुतळा चौक आणि जुना मोंढा, नांदेड येथे लॉयन्स नेत्र रुग्णालय, जंगमवाडी तसेच सिडको येथील डॉक्टर व कर्मचारी यांच्या वतीने नेत्रदान जनजागृतीवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. मृत्यूनंतर नेत्रदान केल्याने दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो, हा अत्यंत संवेदनशील आणि समर्पक संदेश पथ नाट्यातून देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी पथ नाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा साजरा केला जातो. नेत्रदानाचे महत्त्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, नेत्रदाना संदर्भातील गैरसमज व भीती दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांना नेत्र दानासाठी प्रेरित करणे, हा या जनजागृती अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

'मृत्यूनंतर आपले डोळे मातीत जाण्याऐवजी एखाद्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडावी,' असा संदेश रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

ऐतिहासिक जुना मोंढा टॉवर येथे समारोप

रॅलीचा समारोप जुना मोंढा टॉवर येथे वजिराबाद वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष तिडके यांच्या उपस्थितीत करण्यात आला. रॅली सुरळीत पार पाडण्यासाठी वाहतूक शाखेच्या पोलिसांनी सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदान जनजागृतीचा संदेश शहरातील विविध भागांत पोहोचविण्यात रॅली यशस्वी ठरली. समारोप प्रसंगी लॉयन राजेश लोटिया यांनी उपस्थितांचे

# अर्धापूर तालुक्यातील आंबेगाव जवळ लोडिंग पिकअप पलटी; २९ मेंढ्या ठार



**अर्धापूर (प्रतिनिधी) –** धुळे येथून मेंढ्या भरून नवी पेठ आंध्र प्रदेश कडे जाणारी लोडिंग पिकप गाडी दि.५ शनिवारी रोजी स. ४ ते ५ च्या दरम्यान पलटी झाल्याने २९ मेंढ्या जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.

धुळे येथून २९ मेंढ्या घेऊन तेलंगणातील नवी पेठ येथे जात असताना लहान–बारड रोडवरील आंबेगाव गावाजवळ भरधाव वेगात असणारी पिकप लोडिंग पलटी झाल्याने त्यामध्ये असलेल्या २९ मेंढ्या जागीच मरण पावल्या असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मेंढ्या घेऊन जाणारी पिकअप पलटी झाल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांना मिळतात तात्काळ सपोनि.भास्कर कांबळे, जमादार विजय आडे, गौतम कांबळे,विजय कदम यांनी अपघात झालेल्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता सर्व मेंढ्या मूत्यृ झाला असल्याचे आढळून आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# मुदखेड, कंधार, धर्माबाद, मुखेड, नायगाव व बिलोलीतील वीज ग्राहक तक्रार निवारण शिबिरास प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता राजाराम माने यांच्या निर्देशानुसार परिमंडलातील प्रत्येक उपविभागीय कार्यालयात वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी ग्राहक समाधान शिबीर घेण्यात येत आहे. त्यानुसार २२ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान कंधार, लोहा, मुदखेड, धर्माबाद, मुखेड, नायगाव, देगलूर आणि बिलोली व अर्धापूर येथे झालेल्या ग्राहक समाधान शिबिरास वीज ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. विविध शिबिरातून हजारो ग्राहकांच्या समस्यांचे महावितरणकडून निराकरण करण्यात आले.



महावितरणतर्फे आयोजित शिबिरात ग्राहकांकडून चुकीची वीज देयके, अखंडित होणारा वीज पुरवठा, वाकलेले वीज खांब आणि लोंबकळणाऱ्या तारा आदी संदर्भातील समस्या मांडण्यात आल्या. शिबिरास संबंधित उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते, शाखा अभियंते, जनमित्र उपस्थित होते.

यावेळी स्मार्ट मीटरच्या संदर्भाने शंका–समाधानही करण्यात आले. स्मार्ट मीटरमुळे वीज बिलातील अचुकता, पारदर्शकपणा बरोबरच स्मार्ट मीटरमुळे सौर कालावधीतील ८५ पैसे सवलतीचा लाभ ग्राहकांना कसा दिला जातो, याची माहिती देण्यात आली. शिवाय स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा काही ग्राहकांचा संशयही दूर करण्यात आला.

या शिबिरात प्रधानमंत्री मोफत सौरघर योजना, गरीब व दुर्बल घटकातील ग्राहकांसाठी असलेल्या स्मार्ट सौरघर, मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेबदलही माहिती देण्यात आली. शिबिरात हजारो महिला व पुरुष वीज ग्राहक सहभागी होते. वीज बील तक्रारी व इतर समस्यांचे जागेवरच निरसन झाल्याने आणि

# अखेर प्रलंबित असलेला मुख्य रस्ता माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे यांच्या प्रयत्नातून मार्गी, मूलभूत सुविधा अंतर्गत निधी उपलब्ध

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड–उस्माननगर रोडवरील हडको परिसरात येणारा मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने ये–जा करणाऱ्या वाहनधारकांसह परिसरातील नागरिक चिखल, घाणीचे साम्राज्य, कचऱ्यामुळे त्रस्त झाल होते. परिसरातील नागरीकांनी माजी उपमहापौर तथा शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांचे लक्ष वेधले. त्यांनी याप्रकरणी लक्ष घालून आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मूलभूत सुविधा अंतर्गत ३० लक्ष रूपये निधीमधून सदरील रस्ता कामांचा शुभारंभ केला. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



नांदेड–उस्माननगर रोडवरील महात्मा बसवेश्वरनगर ते डॉ. ढगे ज्ञानेश्वर नगर हा मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. यामुळे हडको, सिडकोसह वैभव नगर, वाघाळा भागात ये–जा करणाऱ्या वाहनधारकांना चिखल, घाणीचे साम्राज्य यासह अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या रस्त्यासाठी शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांनी आ. बोंढारकर यांच्या मूलभूत सुविधा अंतर्गत जवळपास २० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून घेतल्यानंतर या रस्त्याचा शुभारंभ आ. बोंढारकर यांच्यासह परिसरातील मान्यवर महिला नागरिक युवक यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या रस्ता खोदकाम काम करून दगड मुरूम टाकून करण्यात येत असून या कामाची पाहणी जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांनी केली असून लवकरच सिमेंट कॉंक्रीट करण्यात येणार असल्याचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी सांगितले.


# आर्य समाजाच्या वतीने नांदेड येथे तीन दिवसीय श्रावणी वेदप्रचार महोत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी) –** आर्य समाज नांदेडच्या वतीने श्रावणी वेदप्रचार मासानिमित्त ९ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत तीन दिवसीय श्रावणी वेदप्रचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव जुना मोंढा परिसरातील आर्य समाज मंदिर येथे संपन्न होणार आहे.

महोत्सवादरम्यान यज्ञ, वैदिक प्रवचने, ज्ञानयज्ञ, महिला संमेलन तसेच शंका–समाधान यांसारख्या विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी गाजियाबाद (उत्तर प्रदेश) येथील प्रख्यात वैदिक विद्वान व व्याख्याते पं. बृजेशजी शास्त्री हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच एटा (उत्तर प्रदेश) येथील भजनोपदेशक पं. शिवपालजी आर्य हे भजन व उपदेशाच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. महोत्सवाच्या तीनही दिवसांत सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत ज्ञानयज्ञ, व्याख्याने व वैदिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे.

वैदिक ज्ञान, संस्कार व प्रबोधनाच्या या पर्वात नागरिकांनी सहकुटुंब सहभागी होऊन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य समाज नांदेडच्या अध्यक्षा श्रीमती जी. व्ही. मारमपल्ले, मंत्री ड. ओम ऋतुध्वज कदम, कोषाध्यक्ष यादवजी भांगे, उपप्रधान अभय कुलकर्णी, उपमंत्री धोंडीबा सुरावार, व्यवस्थापक गजानन डोके तसेच सर्व मार्गदर्शक व सदस्यांनी केले आहे.

# विविध ठिकाणी श्रीकृष्ण गोकुळाष्टमी व दहिहंडी उत्साहात साजरी







**के. रामलू पब्लिक स्कूलमध्ये श्रीकृष्ण गोकुळाष्टमी साजरी**

**कुंडलवाडी (वार्ताहर) –** श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात शाळेतील सुमारे ५०० ते ६०० विद्यार्थ्यांनी राधा–कृष्ण, गोप, गोपिका व गवळणी यांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते साईनाथ शेठ उत्तरवार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सपोनी ज्ञानेश्वर शिंदे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनचरित्रावर आधारित बहारदार नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला पालक व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना साईनाथ शेठ उत्तरवार म्हणाले की, के. रामलू पब्लिक स्कूलच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, संस्कृती व सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्याचे कार्य शाळा करीत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या समृद्ध भारतीय संस्कृतीचा वारसा जपला पाहिजे व तो कधीही विसरता कामा नये.

याप्रसंगी विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी टाळ्यांच्या गजरात तसेच गरब्याच्या तालावर उत्स्फूर्त सहभाग नोंदवत दहीहंडी फोडून श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद द्विगुणित केला. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा व संस्कारांची ओळख करून देणारा हा सोहळा उत्साहात आणि आनंदात संपन्न झाला. हा कार्यक्रम यशस्वी झाल्यामुळे शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कूरवार प्रिन्सिपल संभाजी जाधव व्हाईस प्रिन्सिपल सपना म्हैसेवाड यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्ताने भजन संध्या कार्यक्रम**

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्ताने नंदुसेठ अडकटलवार यांच्या वतीने आयोजित भजन संध्या कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला शहरासह परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी हैदराबाद येथील प्रसिद्ध गायक सुनिल शर्मा यांनी विविध गिते सादर केली. यावेळी विधीवत श्रीकृष्ण पूजन करण्यात येऊन उपस्थित भाविक–भक्तांचे स्वागत करून महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अडकटलवार परिवारातर्फे गोकुळाष्टमी निमित्ताने ४ सप्टेंबर रोजी भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन सप्तगिरी बँकेट हॉल जुना कौठा नांदेड येथे सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आले होते यावेळी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्ताने विधीवत पूजन, महाअभिषेक, महाआरती करण्यात आली. यानंतर उपस्थित आ.प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, नगरसेवक राजू पाटील काळे, अभिषेक सौदे, राजू यन्नम, नगरसेवक प्रतिनिधी गणेश काकडे, राजू लांडगे, धिरज यादव, लक्ष्मण हसेकर, अश्विन पवार, वसमत उपनगराध्यक्ष सीताराम म्यनेवार, आशुतोष राजूरकर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी अडकटलवार परिवाराच्या वतीने मनोहर अडकटलवार, नंदकुमार अडकटलवार, रोहित, अनुज, यश यांच्या वतीने स्वागत करण्यात आले, यावेळी हैदराबाद येथील सुप्रसिद्ध गायक सुनिल शर्मा यांनी कृष्णावर आधारित विविध गिते सादर केली तर हनुमान, श्रीराम, खाटुशाम यासह अनेक गितांवर व यशोमती मैया गीतावर भक्तांनी ठेका धरला होता. तर लहान बालकांनी राधाकृष्ण भूमिका सादर केली. यावेळी उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम हिंदू सकल समाजाच्या वतीने सादर करण्यात आला.

**नरसिंह विघामंदिर प्राथमिक शाळेत गौकुळाष्टमी साजरी**

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नरसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळा सिडको येथे गोकुळाष्टमी निमित्ताने दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृष्ण व राधेची भूमिका अनेक विद्यार्थिनींनी साकारली.

५ सप्टेंबर रोजी गोकुळ अष्टमीनिमित्ताने बालगोपाळांचा वर्ग पहिली ते चौथीचा दहीहंडीचा उपक्रम अतिशय आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी एक ते चारच्या मुली राधेच्या वेशभूषेत तर कृष्णाच्या वेशभूषेत मुले आली होती. तसेच विद्यार्थ्यांना दहीहंडीबद्दल माहिती देऊन हा उपक्रम सादर केला.

या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एकुंडवार यांच्यासह व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. बी. क्षीरसागर यांनी केले तर आभार जी. टी. बसवदे यांनी मानले.

# भक्तिरसात रंगला शिवमहापुराण कथेचा सांगता सोहळा

## संगीतमय निरूपणातून भगवान शिवांच्या भक्ती, त्याग आणि सदाचाराचा संदेश

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील गणेश नगर–मधील श्री गणेश मंदिरात गेल्या काही दिवसांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या शिवमहापुराण कथेच्या सांगता दिनी परिसरात श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. शिवमहापुराणातील विविध प्रसंग, भगवान शिवाचे महात्म्य, भक्तीची शक्ती आणि मानवी जीवनाला दिशा देणारे विचार यांचे अत्यंत रसाळ व भावपूर्ण निरूपण करण्यात आले.

संगीतमय समर्थ भक्त राघवेंद्र महाराज देशपांडे यांनी आपल्या ओघवत्या वाणीने शिवमहापुराणातील कथाभाग भक्तांसमोर सादर केला. त्यांच्या कथनाला भावपूर्ण संगीताची साथ लाभल्याने संपूर्ण वातावरण शिवभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले. तबला : आदित्य उपाध्ये आणि पेटी दत्तात्रय वर्तक यांच्या सुरेल साथीने कथेला अधिकच भावस्पर्शी उंची प्राप्त झाली. कथा, अभंग, भजन, श्लोक आणि संगीताच्या माध्यमातून भक्तांना भगवान शिवाच्या स्वरूपाचे आध्यात्मिक दर्शन घडले.

शिवमहापुराण हे केवळ पुराणकथांचे संकलन नसून, शिव हे विश्वाचे मूळ तत्व असून, मानवी जीवन जगण्याची मूल्यदृष्टी देणारा आध्यात्मिक ग्रंथ आहे. अहंकाराचा त्याग, सत्याचा मार्ग, संयम, परोपकार, श्रद्धा आणि भक्ती यांचे महत्त्व या कथेतून अधोरेखित करण्यात आले. भगवान शिव हे संहाराचे नव्हे, तर अहंकाराचा संहार करून कल्याणाचा मार्ग दाखविणारे देव असल्याचा संदेश कथेतून देण्यात आला.

शिवमहापुराण ग्रंथात एकूण ६ सहिता, १४ खंड व २४,००० श्लोक आहेत. यामधील कथांचा बोध आपल्या दैनंदिन जीवनात जोडला तर जीवनाचा उद्धार नक्की होईल. जगातील शिवमंदिरे व ज्योतिर्लिंग सत्यघटनांची साक्षीदार आहेत. कथेच्या अंतिम टप्प्यात भक्तिमय वातावरण अधिकच उत्कट झाले. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी एकाग्रतेने कथा श्रवण करत अध्यात्मिक अनुभूती घेतली. सांगता प्रसंगी शिवमहापुराणाच्या श्रवणातून मिळालेली शिकवण आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संदेश देण्यात आला.

संगीत, कथा आणि भक्तीचा सुरेल त्रिवेणी संगम साधत झालेला हा शिवमहापुराण सांगता सोहळा भाविकांच्या स्मरणात कायम राहणारा ठरला.




# प्रगतीमंत्र

## 82,000 हून अधिक लोकांनी नोकऱ्या गमावल्या

layoffs.fyi च्या अहवालानुसार, २०२६ मध्ये १९२ टेक कंपन्यांनी ८२,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. यात इंटेल ३७,००० (जानेवारी-एप्रिल २०२६), मायक्रोसॉफ्ट १५,००० (फेब्रुवारी-मे २०२६), एचपी २,००० (फेब्रुवारी २०२६) यांचा समावेश आहे. लिंक्डइनचा फ्युचर स्किल्स रिपोर्ट २०२५-३० मध्ये असे म्हटले आहे, की तंत्रज्ञान, प्रगती, ऑटोमेशन आणि बदलत्या जागतिक प्राधान्यक्रमांमुळे नोकरी बाजारपेठ वेगाने बदलत आहे. अहवालात पुढील ५ वर्षांत मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या टॉप हार्ड स्किल्सची यादी देण्यात आली आहे.

# एआयच्या युगात नोकरी वाचवणारी 5 कौशल्ये

**येत्या काळात जॉब मार्केटमध्ये वेगाने बदल होणार आहेत. मायक्रोसॉफ्ट, टीसीएस, गुगल, इंटेल, टेस्ला सारख्या मोठ्या कंपन्यांमध्ये सुरू असलेली कर्मचाऱ्यांची चाळणी याकडेच लक्ष वेधत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे चाळणी करण्याचे सर्वात मोठे कारण असल्याचे मानले जाते. एआयच्या युगात, एकीकडे नोकऱ्या झपाट्याने कमी होत असताना, दुसरीकडे नवीन कौशल्यांनी (फ्यूचर स्किल्स) सुसज्ज असलेल्या लोकांनाही संधी मिळत आहेत.**




### शाश्वतता (Sustainability)

- : कॉर्पोरेट आणि गुंतवणूक जगात सस्टेनेबिलिटीमध्ये अलीकडेच घट झाली असली तरी, ते भविष्यातील एक महत्त्वाचे कौशल्य आहे, कारण हवामान बदल, संसाधनांचा ऱ्हास आणि नियामक दबाव यासारखी जागतिक आव्हाने कमी होत नाहीत. उलट, ते अधिक तीव्र होत आहेत. हवामान बदल, संसाधनांचा तुटवडा आणि नियामक दबाव वाढत असताना, संस्था सस्टेनबल व्यवसाय पद्धती, अक्षय ऊर्जा, सर्कुलर अर्थव्यवस्थेची तत्त्वे आणि पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन यासारख्या कौशल्यांची मागणी वाढत्या प्रमाणात करतील.

- डेटा सायन्स : कंपन्या आता डेटा-सायन्सच्या आधारे मोठे निर्णय घेत आहेत. यामध्ये मोठ्या डेटासेटचे विश्लेषण करणे, एआय मॉडेल्स तयार करणे आणि प्रक्रिया ऑप्टिमायझ करणे समाविष्ट आहे. बिग डेटा, आयओटी आणि ऑटोमेशनच्या वाढीसह, रिअल-टाइम माहिती व्यवस्थापित करणे महत्वाचे आहे. मशीन लर्निंग आणि एआयच्या आधारे निर्णय घेतले जात आहेत, ज्यामध्ये पारदर्शकता देखील खूप महत्वाची आहे. अशा परिस्थितीत, पायथॉन, एसक्यूएल आणि डेटा व्हिज्युअलायझेशन कौशल्ये असणे तुम्हाला नोकरीची हमी देऊ शकते. एआयच्या युगात डेटा सायन्समध्ये प्रभुत्व मिळवल्याने तुमचे करिअर सुरक्षित राहील.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) : एआयच्या आगमनाने कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे. म्हणूनच, एआय तज्ञांची मागणी देखील वाढत आहे, जी येत्या काळात सर्वात जास्त मागणी असलेल्या कौशल्यांपैकी एक असेल. एआय मॉडेल विकसित करणे, मशीन लर्निंग अल्गोरिदम प्रशिक्षित करणे आणि वास्तविक जगातील समस्यांवर एआय उपाय लागू करणे यासारखी कौशल्ये आवश्यक असतील. केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे राहणार नाही, यासोबतच, एआय एथिक्स, मूलभूत गोष्टी आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम समजून घेणाऱ्यांची गरज भासेल. आरोग्यसेवा असो, वित्त असो, विपणन असो किंवा उत्पादन असो, एआय कौशल्यांनी सुसज्ज असलेल्यांनाच संधी मिळतील.
- सायबर सुरक्षा : तांत्रिक काम जसजसे वाढत जाईल तसतसे सायबर सुरक्षेचे काम देखील वाढत जाईल. म्हणूनच सायबर सुरक्षा ही भविष्यातील सर्वात मागणी असलेल्या कौशल्यांपैकी एक मानली जात आहे. जग अधिकाधिक डिजिटल आणि तंत्रज्ञानावर अवलंबून होत आहे. व्यवसाय, सरकारी आणि वैयक्तिक पातळीवर ऑनलाइन संवेदनशील माहिती हाताळणाऱ्यांसोबतच सायबर सुरक्षा व्यावसायिकांची मागणी गगनाला भिडत आहे. यासाठी धोका शोधणे, एथिकल हॅकिंग, एन्क्रिप्शन, जोखीम असेससमेंट आणि रिस्पॉन्स यासारख्या कौशल्यांची आवश्यकता असेल.
- UX डिझाइन : डिजिटल संवाद अधिकाधिक पर्सनल आणि AI-संचालित होत असल्याने यूजर एक्सपीरियंस (UX) डिझाइन हे भविष्यातील एक महत्त्वाचे कौशल्य आहे. वेबसाइट्स, ॲप्स आणि डिजिटल उत्पादने वापरकर्त्यांसाठी सोपी आणि आकर्षक बनवण्यात येत आहेत. व्यवसाय वापरकर्त्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि ग्राहकांना आनंदी ठेवण्यासाठी स्पर्धा करत असताना UX व्यावसायिकांची मागणी वाढत आहे.

# करूया मार्केट रिसर्च..!

**एखादं उत्पादन बाजारात आणण्याआधी त्या बाजाराचा आढावा घेतला जातो. त्याचं एक सर्वेक्षण केलं जातं. यालाच मार्केट रिसर्च म्हणतात. ग्राहकांची आवडनिवड, त्यांची मतं, इच्छा आदी गोष्टींचा विचार यात केला जातो. या क्षेत्राला आता चांगली मागणी आहे. म्हणूनच त्यात करिअरच्या अनेक संधीसुद्धा आहेत.**



मार्केट रिसर्च या क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी चांगल्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. इथे तुम्हाला जागतिक पातळीवर अनेक संधी मिळू शकतील. आपलं उत्पादन बाजारात आणण्यापूर्वी मार्केट अर्थात बाजारपेठ समजून घेतली जाते. बाजाराचं हे सर्वेक्षण म्हणजेच मार्केट रिसर्च. झपाट्याने वाढणारं असं हे क्षेत्र आहे. ग्राहकांची मते, त्यांची आवडनिवड, गरजा आणि इच्छा जाणून जी माहिती संकलित केली जाते तोच हा मार्केट रिसर्च. माहिती मिळवण्याचं हे काम विविध पद्धतींनी केलं जातं. एकत्रित, संकलित केलेल्या या माहितीच्या आधारे मग, कंपन्या लोकांच्या (ग्राहकांच्या) गरजा जाणून तशा प्रकारचं उत्पादन अथवा सेवा (सर्व्हिस) बाजारात आणण्याचं ठरवतात. या माहितीमुळेच कंपन्यांना आपला ग्राहकवर्ग कोण हे ठरवता येतो. त्यानुसार जाहिरात केली जाते. नेमक्या शब्दांत सांगायचं झालं, तर आपला 'टार्गेट ऑडियन्स' ओळखणं कंपन्यांना शक्य होतं.

मार्केट, मार्केटिंग रिसर्च ॲनालिस्टचा (बाजार संशोधन विश्लेषक) संबंध संभाव्य उत्पादनाच्या, सेवेच्या विक्रीशी असतो. भूतकाळातील विक्रीच्या आकडेवारीवरूनच हे विश्लेषक भविष्यातील विक्रीचा अंदाज वर्तवतात. आपल्या स्पर्धक कंपन्यांची माहिती मिळवणे, त्यांच्या उत्पादनांची किंमत, विक्री आणि मार्केटिंग-डिस्ट्रिब्युशनच्या (विपणन आणि वितरण) पद्धती आदी माहिती हे संशोधक गोळा करतात. आपल्याला पाहिजे ती माहिती मिळवण्यासाठी स्वतःची अशी योजना, कार्यपद्धती हे संशोधक आखतात. ग्राहकांची पसंती जाणून घेण्यासाठी, त्यांच्याकडून माहिती मिळवण्यासाठी हे संशोधक टेलिफोन, इमेल, इंटरनेट आदी माध्यमांचा वापर करतात तर काही वेळा दारोदारी जाऊन ग्राहकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन ही माहिती गोळा केली जाते. शॉपिंग मॉल्स किंवा अशाच गर्दीच्या ठिकाणी स्टॉल्स टाकून ग्राहकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला जातो. बाजार संशोधन विश्लेषकाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षत मुलाखतकार हे सर्वेक्षणातून माहिती मिळवण्याचं काम केलं जातं. मार्केटिंग रिसर्चच्या नोकरीसाठी कोणत्याही शाखेतील बॅचलर डिग्री ही किमान शैक्षणिक अर्हता आहे. इंग्रजीवरील प्रभुत्व आणि मार्केटिंग, इकॉनॉमिक्स, स्टॅटिस्टिक्स, सायकोलॉजी, सोशिओलॉजी आणि पॉलिटिकल सायन्स कोर्सची पार्श्वभूमी या क्षेत्रातील नोकरीसाठी उपयुक्त ठरते.

# मेडिकल स्टोअर उघडण्यासाठी कोणती पदवी असावी?

**आजकाल मेडिकल दुकाने किंवा फार्मसी आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहेत, जिथून लोक अनेकदा काही ना काहीतरी खरेदी करत राहतात. गावातील रस्त्यांवर उघडलेले छोटे औषध दुकान असो किंवा मोठ्या अपार्टमेंट इमारतींमध्ये असलेली फार्मसी असो, वैद्यकीय उत्पादने आणि औषधांची मागणी सर्वत्र वाढत आहे. यामागील मुख्य कारणे म्हणजे वाढती लोकसंख्या आणि लोकांमध्ये आरोग्याविषयी वाढती जागरूकता, ज्यामुळे मेडिकल स्टोअर उघडणे देखील चांगला व्यवसाय मानला जात आहे. मात्र व्यवसाय सुरू करण्यासाठी काही नियम आहेत...**



### सामान्य दुकान नव्हे...

मेडिकल किंवा औषधांचा व्यवसाय सुरू करणे हे किराणा दुकान उघडण्यासारखे नाही. कारण हे काम थेट लोकांच्या आरोग्याशी संबंधित आहे. म्हणून, सरकारने यासाठी नियम आणि कायदे खूप कडक केले आहेत. फक्त पैसे पुरेसे नाहीत, यासाठी योग्य पदवी, परवाना आणि कायदेशीर ज्ञान देखील खूप महत्वाचे आहे.

### पात्रता अन् पदवी...

कोणतेही मेडिकल स्टोअर उघडण्यासाठी, तुमच्याकडे फार्मसी पदवी आवश्यक आहे. यासाठी, फार्मसीमध्ये डिप्लोमा (डी. फार्म) किंवा फार्मसीमध्ये बॅचलर (बी. फार्म) असणे आवश्यक आहे. याशिवाय, ही पदवी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय) द्वारे मान्यताप्राप्त संस्थेची देखील असावी. या पदवींशिवाय, तुम्हाला औषधे विकण्याचा परवाना मिळणार नाही.

### तुमच्याकडे पदवी नसेल तर...

जर तुमच्याकडे स्वतः फार्मसी पदवी नसेल, तरीही तुम्ही मेडिकल स्टोअर उघडू शकता, परंतु यासाठी मेडिकल स्टोअरमध्ये परवानाधारक फार्मासिस्टला कामावर ठेवण्याचा नियम आहे. लक्षात ठेवा की फार्मासिस्ट दुकानाच्या कामकाजाच्या वेळेत उपस्थित असावा आणि त्याचे नाव राज्य फार्मसी कौन्सिलमध्ये नोंदणीकृत असले पाहिजे.

### परवाना आणि कायदेशीर नियम...

औषधांचा परवाना फक्त एकाच दुकानासाठी वैध असतो. दुसरे दुकान उघडण्यासाठी वेगळा परवाना आवश्यक असतो. प्रत्येक दुकानात परवानाधारक फार्मासिस्ट असणे आवश्यक आहे. याशिवाय, एकाच परवान्यावर अनेक दुकाने चालवणे बेकायदेशीर आहे, असे केल्याने मोठा दंड होऊ शकतो आणि परवाना रद्द देखील होऊ शकतो.

# ...तर व्यवसायात यश पक्कं!

**व्यवस्थापन हा व्यवसायाचा महत्त्वाचा भाग आहे. व्यवसाय यशस्वी करण्यासाठी त्याचे विचारपूर्वक नियोजन करणे आवश्यक असते. त्यासाठीच व्यवसायाचा आराखडा तयार करून व्यवसायाच्या भविष्याचे चित्र आधीपासूनच तयार केले जाते. व्यवसायातील ध्येय ठरवून निरनिराळ्या पातळींवर त्याचा आराखडा तयार केला की यश मिळण्याची शक्यता खूपच वाढते.**

### तीन महत्वाचे मुद्दे...

तीन महत्त्वाचे मुद्दे तुमच्या आराखड्यात असणे आवश्यकच आहे. तुम्ही कोण आहात? तुम्हाला या क्षेत्रात नेमके काय करायचे आहे व तुम्ही स्वतः व कंपनीचे पाय घट्ट रोवून किती काळ उभे राहू शकता यावर विचार करायला हवा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमचे ग्राहक कोण असणार, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे नियोजन करा. तुमच्या ध्येयावर ठाम राहा. तुमची विक्री, उत्पन्न आणि नफा-तोटा यासाठी कोण जबाबदार असेल याचा विचार करा. हा आराखडा ५ ते ४० पानांचा असू शकतो. मुख्य मायना १०-१२ पानांचा व ५-६ पाने आर्थिक माहिती वा फायनान्स प्लानचा हवा. आराखडा करताना सुरुवातीला निवडलेला व्यवसाय, व्यवसायाची व्याप्ती, ग्राहकांची वैशिष्ट्ये, या व्यवसायातील स्पर्धक असतील तर त्यांची वैशिष्ट्ये यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. आपले विचार वास्तवात आणण्यासाठी आपल्याला त्याचे सविस्तर वर्णन करावे लागते. ध्येय गाठण्यासाठी विविध टप्पे करून प्रत्येक टप्प्यावर आपण कुठे पोहचू हे माहीत असावे लागते. नेमक्या गरजांचा अंदाज घेणे हा आढाव्यामागचा एक महत्त्वाचा टप्पा असतो. आपला आराखडा वास्तवात आणण्यासाठी नेमक्या कोणत्या कौशल्याची गरज आहे? कोणती यंत्रसामग्री लागेल? वेळेचे गणित काय असेल? कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण लागेल? सर्वात प्रथम कोणती कृती करायची येथपासून सर्व कृती क्रमाक्रमाने लिहिणे या ठिकाणी अपेक्षित आहे. कृती आराखड्यावरून कृतीची यादी करताना यापुढे ती कृती किती दिवसांत, कोणी करायची. त्यासाठी मनुष्यबळ किती लागेल आणि कृती पूर्ण झाल्याची नोंद करावी लागते.

आजची योजना हे उद्याचे यश असते. तुमच्या व्यवसायाची मांडणी तुम्ही कशी करणार याचा विचार करा. तुमच्या मनात तुमच्या व्यवसायाचे चित्र पूर्ण आहे का? असेल तर ते लिहून काढा. त्यावर पुन्हा पुन्हा विचार करा, त्यातल्या मर्यादा, संभावित तोटे यांचा पुन्हा पुन्हा विचार करा आणि मगच कामाला लागा. तुमच्या व्यवसायाचा आराखडा हे तुमच्या हातातील सर्वात महत्त्वाचे हत्यार आहे. यामुळे तुम्ही व्यवसाय सुरू करू शकता किंवा वाढवू शकता. तुम्ही बनवलेला आराखडा हा तुमच्या कल्पनांचा व ध्येयाचा उत्तम संवादक असावा. व्यवस्थापन हा व्यवसायाचा महत्त्वाचा भाग आहे. कुठलाही क्रिकेटचा सामना खेळण्याआधी त्याची योजना तयार करावी लागते. ज्या संघाचे नियोजन जबरदस्त असते त्या संघाला मैदानात योग्य रणनीतीच्या आधारावर सामना जिंकता येतो. याचाच अर्थ फक्त खेळ खेळता येणे हे सामना जिंकण्यासाठी पुरेसे नाही. सामना जिंकण्यासाठी त्याचे पूर्ण नियोजन, आराखडा तयार करता आला पाहिजे. त्याचप्रमाणे व्यवसाय यशस्वी करण्यासाठी त्याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे. हे नियोजन पुढचा काळ गृहीत धरून, भविष्याचे चित्र समोर ठेवून तयार केले जाते. त्यासाठी व्यवसायातील ध्येय नेमके काय आणि ते कधीपर्यंत साध्य करायचे आहे आणि पुढच्या काळात ते कसे वाढवत नेणार ते ठरवणे आवश्यक आहे.




आपला विचार प्रत्यक्षात उतरवण्याच्या मार्गक्रमणाच्या आराखड्यानुसार प्रत्येक टप्प्याच्या खर्चाच्या दृष्टीने विचार करून कोणत्या कृतीला किती खर्च येईल याचा तपशील या भागात असतो. आराखड्यानुसार खर्चाचा अंदाज घेतल्याने प्रत्यक्ष खर्च आणि अंदाज यात फार तफावत राहात नाही आणि काही खर्च विचारात घ्यायचे राहून गेले असेही होत नाही. आपला आराखडा म्हणजे आपल्या उद्योगाची ब्लुप्रिंट! यामध्ये सुरुवातीचे भांडवल, उत्पादनांचा खर्च, कच्चा माल कुठे आणि कसा मिळणार, प्रॉडक्ट ब्रॅण्ड, मार्केटिंग प्लॅन, प्रॉफिट मार्जीन, तुमचे स्पर्धक-त्यांचे उत्पादन अशा सगळ्या गोष्टींचा सामावेश असतो. या आराखड्याची चार विभागांत जर विभागणी केली तर पहिल्या विभागात व्यवसायाची दूरगामी उद्दिष्टे, दुसऱ्या विभागात ध्येय साध्य करण्याकरिता उपयोगी पडतील असे निर्णय कोणते ते सांगणे. तिसऱ्या विभागात दैनंदिन कामकाज ज्या प्रक्रियेद्वारे चालते त्याचा सामावेश होतो आणि चौथ्या विभागात ठरवलेल्या योजनेनुसार जर गोष्टी झाल्या नाहीत तर आधीपासून ठरवलेला दुसरा प्लॅन व तिसरा प्लॅन कोणता हे ठरवायचे काम होते. पहिल्या विभागात किंवा पहिल्या टप्प्यामध्ये वार्षिक व्यावसायिक यश संपादन करण्यासाठी व्यवसायाच्या विविध विभागांना अनुसरून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातात. व्यवसायामध्ये आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी प्राधान्य देऊन निर्णय ठरवले जातात. व्यवसायाची वार्षिक विक्री, ध्येय, नफा प्राप्ती, उत्पादनक्षमता, मार्केटिंग, ग्राहकसेवा, बजेट वा भांडवल उभारणी इत्यादी ठरवले जाते. उदाहरण घ्यायचे झाल्यास एखाद्या मॅन्युफॅक्चिरग कंपनीचे ध्येय १ कोटी

### खर्चाचा अंदाज घेणे...

रुपये असेल तर त्यासाठी काय करावे लागेल? मनुष्यबळ किती लागेल, टीम कशी निवडायची भांडवल कधी कधी आणि किती लागेल व ते कसे उभे करणार याचा विचार करावा लागतो. यानंतर लगेचच आपल्याला दुसरा विभाग कार्यान्वित करावा लागतो. यामध्ये विशेष व्यावसायिक निर्णयांचा विचार करावा लागतो. यामध्ये आपण निवडलेल्या सहकाऱ्यांशी बोलून ध्येय निश्चितीचा रस्ता कसा पार करायचा याची तयारी करावी लागते. जर आपण ठरवलेल्या लक्ष्यांमध्ये (टार्गेट) वाढ करण्याची वेळ आली किंवा कमी पडलो तर अंतर्गत पुरवठा उत्पादन प्रक्रिया, नवीन यंत्रसामग्री, पुरवठ्याच्या प्रक्रियेचा दर्जा या बाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात येतात. आपण तयार केलेला कृती-आराखडा वास्तवात किंवा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तिसऱ्या विभागाची मदत घ्यावी लागते. आपण कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कोणकोणत्या गोष्टी प्रत्यक्षात कृती स्वरूपात करणार याचे पूर्ण आकलन आराखडा या भागात बनवता येतो. कारण शेवटी घेतेलेला निर्णय व त्यांची अंमलबजावणी यातला दुवा कामगारवर्ग असतो आणि त्याप्रमाणे कामाची विभागणी आपल्याला करायची असते. यामध्ये प्रत्येक टप्प्या टप्प्यावर लक्ष ठेवून ते पूर्ण करून घ्यावे लागते. चौथ्या विभागाकडे जर आपण ठरवलेल्या गोष्टी अपेक्षेप्रमाणे होत नसतील तर आपल्या आराखड्यातील कृती १, कृती २ आणि कृती ३ असे भाग करावे लागतील. पहिल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना जसे हवे तसे फळ मिळत नसेल तर दुसरा आराखडा हातात घ्यायचा निर्णय घ्यावा लागतो. असे होऊ नये म्हणून स्ट्रेटॅजिक प्लॅनिंग करावे लागते. अशा पद्धतीने बनवलेला व्यवसायाचा रिपोर्ट आपल्याला बँकांना, भांडवल गुंतवणूकदारांना आपला चोख व्यवसाय हेतू कळण्याकरिता होतो. सुरुवातीला तुमची माहिती, कंपनीची माहिती, तुमची व्यावसायिक उद्दिष्ट्ये, व्यवसायाचे ध्येय, आपल्या चांगल्या गोष्टी, आपले स्ट्राँग पॉइंट, वीक पॉइंट, व्यवसायाचा यूएसपी म्हणजे आपल्या व्यवसायाची वैशिष्ट्ये आणि व्यवसायाची बाजारपेठ आणि वार्षिक ध्येयाला अनुसरून तिमाही किंवा मासिक ध्येय ठरवणे ही असते. जाहिरातीसाठी एक वेगळा विभाग त्यामध्ये असावा लागतो. कंपनीचे प्रोफाइल चांगले लिहिणे फार महत्त्वाचे आहे. थोडक्यात, व्यवसाय सुरू करण्याआधी त्याचा पूर्ण आणि विचारपूर्वक केलेला आराखडा तयार करणे खूपच महत्त्वाचे आहे. त्यावरच तुमचे यशापयश अवलंबून असते.

# श्रींच्या आगमनाला तुफान पाऊस येणार, १३ ते १७ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता

## हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांचा अंदाज



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंत घेतली आहे. श्रावण महिना आता संपत आला असला तरी श्रावणसरी बरसलेल्या दिसल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये अपेक्षित पाऊस न पडल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती आहे. तसेच शेतीसाठी देखील अपेक्षित पाऊस न पडल्याने शेतकरीदेखील चिंतेत आहेत. असं असताना हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी नवी आशा देणारा अंदाज वर्तवला आहे. त्यांच्या अंदाजानुसार राज्यात गणेशोत्सवाच्या सुरुवातीला मुसळधार पाऊस पडणार आहे.

राज्यात १३ ते १७ सप्टेंबर या काळात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील ज्या भागांमध्ये पाऊस पडला नव्हता, तसेच धाराशिव, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये अपेक्षित पाऊस पडला नव्हता. पण आता या भागांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये ६ आणि ७ सप्टेंबरच्या दरम्यान पावसाची शक्यता आहे. हा पाऊस पिकांना जीवनदान देणारा पाऊस ठरणार आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे, असं पंजाबराव डख म्हणाले आहेत.

# कल्याण ते लातूर आता अवघ्या ४ तासांत; ३५ हजार कोटींच्या ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेला मंजुरी

**मुंबई(प्रतिनिधी)–** मुंबई महानगर प्रदेश आणि मराठवाड्याला थेट जोडणाऱ्या कल्याण-लातूर जनकल्याण एक्सप्रेसवेला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. सुमारे ४४२ किलोमीटर लांबीचा आणि सहा पदरी असलेला हा ग्रीनफिल्ड, पूर्णपणे क्सेस-कंट्रोल्ड एक्सप्रेसवे तयार झाल्यानंतर कल्याण ते लातूरचा प्रवास सध्याच्या १० ते ११ तासांवरून अवघ्या ४ तासांवर येण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (MSRDC) या महामार्गाचे काम केले जाणार आहे. या महामार्गामुळे ठाणे, कल्याण, अहिल्यानगर, बीड, धाराशिव आणि लातूर हे भाग वेगाने जोडले जाणार आहेत.

या एक्सप्रेसवेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माळशेज घाटात तब्बल ८ किलोमीटर लांबीचा बोगदा उभारला जाणार आहे. त्यामुळे घाटातील वळणावळणाचा रस्ता, वाहतूक कोंडी आणि प्रवासातील अडचणी कमी होण्याची अपेक्षा आहे.

कल्याण-लातूर एक्सप्रेसवे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवेच्या विरार-गछ्झढ लिंक तसेच रिंग रोड नेटवर्कशी जोडला जाणार आहे. यामुळे मराठवाड्यातून मुंबई आणि गछ्झढ बंदरापर्यंत मालवाहतूक अधिक सुलभ होण्याची शक्यता आहे. तसेच हा मार्ग विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉरलाही जोडला जाणार आहे. लातूरच्या दिशेला या एक्सप्रेसवेचा इंटरचेंज नागपूर-गोवा शक्तिपीठ एक्सप्रेसवेशी होणार आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि गोवा यांच्यातील दळणवळणालाही चालना मिळू शकते.



हा नवीन ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे सध्याच्या NH-61 (कल्याण-अहमदनगर-नांदेड हायवे) ला समांतर असणारा हायस्पीड कॉरिडॉर ठरेल. हा महामार्ग कल्याण, मुरबाड, माळशेज घाट (८ किमी टनल), ओतूर (आळेफाटा), अहिल्यानगर, पाथर्डी, बीड, मांजरसुंबा, अंबाजोगाई मार्गे लातूरला पोहोचेल. भविष्यात या महामार्गाचा विस्तार महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील बिदर आणि गुलबर्गा मार्गापर्यंत करण्याचा प्रस्ताव आहे.

# औषध निरीक्षक पेपरफुटीत सहभाग आढळल्यास आयोगातल्या व्यक्तीलाही कठोर शिक्षा होईल -मुख्यमंत्री

**मुंबई(प्रतिनिधी)** –देशातील नीट पेपर-फुटीनंतर देशभरात मोठं आंदोलन झाल्याचं पाहायला मिळालं, दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनास देशभरातून पाठिंबा मिळाल्याने अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आला. मात्र, त्यानंतरही महाराष्ट्रात सीईटी आणि चझडउ पेपरफुटीच्या घटना घडल्या. सर्वात पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा म्हणून एमपीएससीकडे पाहिले जाते. मात्र, एमपीएससीच्या औषध निरीक्षकपदासाठीचा पेपर फुटल्याने पुन्हा एकदा पेपरफुटी चव्हाट्यावर आली. याप्रकरणी, पोलिसांनी आत्तापर्यंत ६ हून अधिक आरोपींना अटक केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थी शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची) भेट घेतली.

एमपीएससी परीक्षा पद्धती संदर्भात स्पर्धा परीक्षा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी काही मागण्या केल्या. यामध्ये शिक्षक सचिन ढवळे, यशवंत सोलाट, धनंजय मते, गणेश कड, उमेश कुदळे, विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते निखिल पाटील यांच्यासह स्पर्धा परीक्षा शिक्षक-विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना प्राधान्यक्रम देत, MPSC पेपरफुटीच्या गैरप्रकारात आयोगातील किंवा आयोगाबाहेरील ज्या व्यक्तींचा सहभाग आढळेल, त्या सर्वांना कठोर शिक्षा केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## Change In Name

MY OLD NAME IS Mohammad iftakhar NOW I AM CHANGING AS NEW NAME MOHAMMAD IFTEKHAR MOHAMMAD IQBAL. HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME.

Adress-1/4/9 opp shivaji Nagar police station maqdoom nagar nanded431602

## टी. सी. हरवली

माझी जय दिलीपराव धुमाळ या नावाची इयत्ता १२ वी पासची टी.सी. व कागदपत्रे अर्धापूर ते नांदेड दरम्यान एसटी प्रवासात हरवली आहेत. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- जय दिलीपराव धुमाळ रा. शेनी, ता. अर्धापूर जि. नांदेड मो.९०२२२१२००३

## टी. सी. हरवली

माझी बुद्धभूषण मिलिंद गजभारे या नावाची इयत्ता ९ वी पासची टी. सी. व मार्कमेमो रेल्वेस्टेशन ते वाजेगाव दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता-बुद्धभूषण मिलिंद गजभारे, रा. पंचशील बुद्ध विहार वाजेगाव, ता. जि. नांदेड. मो. ९६८९८०९११३

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९४/२०२६ पुढील तारीख - १२.१०.२०२६

अर्जदार :०१. राजू पि. शिवन्ना बुध्देवार, वय ४८ वर्षे, धंदा -शेती, रा. बामणी (बु) ता. बिलोली जि. नांदेड मो. नं. ९८६०९८८८६७

०२. गोविंद पि. शिवन्ना बुध्देवार, वय ५३ धंदा -- शेती, रा. बामणी (बु) ता. बिलोली जि. नांदेड हा. मु. रा. अप्रतीम पुष्पा, राधा मंगलकार्यालय जवळ बीड बायपास, औरंगाबाद जि. औरंगाबाद (एम.एस.), ०३. बालाजी पि. शिवन्ना बुध्देवार वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बामणी (बु) ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत लिंगाबाई भ्र. शिवन्ना बुध्देवार यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र ०१ ते ०३ ही मयत लिंगाबाई भ्र. शिवन्ना बुध्देवार यांची अपत्ये आहेत. मयत लिंगाबाई भ्र. शिवन्ना बुध्देवार हे बामणी ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवासी होते त्यांच्या मृत्यू दिनांक २०/०४/२०२१ रोजी बामणी येथे झाला. अर्जदार क्र ०१ ते ०३ यांचे वडील मयत शिवन्ना पिराजी बुध्देवार हे दिनांक १९/०२/२०१५ रोजी मृत्यू झाले आहेत. अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हयांना मयत लिंगाबाई भ्र. शिवन्ना बुध्देवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८









## Change In Name

MY OLD NAME IS SHEIKH RAMJAN HASAN SHA NOW I AM CHANGING AS NEW NAME SHAIKH RAMJAN HASAN SHAH HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME.

FULL ADDRESS- H. NO. 193, MUSLIM GALLI UMRA AT POST UMRA, TQ. LOHA, DIST. NANDED MS-431707.

MOB.NO.-9637307002

**महाराष्ट्र शासन**

**सा.बां. विद्युत विभाग नांदेड**

**दरपत्रक सूचना क्रमांक (०१) सन-२०२६-२०२७**

कार्यकारी आभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग नांदेड (दूरध्वनी क्र. ०२४६२ - २९५४४०) उत्पादकाकडुन Providing & Installation of Diesel Generator of 125KVA Capacity for proposed Taluka Court Building at Umri Tq. Umri, Dist.Nanded. (Part-H) या उपकरणाचे दरपत्रक मागवित आहेत. उपरोक्त उपकरणाचे सखोल विनिर्देश https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व सा.बां. विद्युत विभाग स्नेहनगर नांदेड या कार्यालयात सुचना फलकावर उपलब्ध आहे.

१. या दरपत्रकाविषयी संपुर्ण माहिती खाली दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देयात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलांची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२. सदर दरपत्रके दि. ०७/०९/२०२६ ते दि.१७/०९/२०२६ रोजी १४.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध राहिल.

https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विद्युत, विभाग, नांदेड

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व.
स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९६/२०२६

अर्जदार : ०१. सरस्वतीबाई भ्र. नारायणराव अरगुलवार, वय - ६० वर्षे, धंदा - घरकाम, ०२. दत्तात्रय पि. नारायणराव अरगुलवार, वय - ४२ - धंदा शेती व व्यापार, ०३. आनंद पि. नारायणराव अरगुलवार, वय - ३८ वर्षे, धंदा -शेती व व्यापार अर्जदार क्र. १ ते ३ रा. गांधीचौक, बिलोली ता. बिलोली जि. नांदेड ०४. अनुराधा भ्र. रामेश्वर मद्रेवार, वय - ४१ वर्षे, धंदा - घरकाम रा. वसंत नगर, नायगांव ता. नायगांव जि.नांदेड.

पुढील तारीख - १२.१०.२०२६

विरुध्द.

गैरअर्जदार-निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत नारायण पि. दिगंबरराव अरगुलवार यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र ०१ ही मयत नारायण पि. दिगंबरराव अरगुलवार यांची पत्नी असून अर्जदार क्र २ ते ३ हे मुले आहेत. व अर्जदार क्र ४ ही विवाहित मुलगी आहे. मयत नारायण पि. दिगंबरराव अरगुलवार हे गांधीचौक बिलोली ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवासी होते त्यांच्या मृत्यू दिनांक १७/०४/२०२६ रोजी गांधीचौक बिलोली येथे झाला. अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हयांना मयत नारायण पि. दिगंबरराव अरगुलवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०९/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

**कार्यालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड**

सहकार भवन, भू-विकास बँक इमारत पहिला मजला, आय.टी.आय. समोर, नांदेड.

[ Email ID - dyrcsnanded@gmail.com]

जा.क्रं. उपनिनां कक्ष-७/प्रा.मत.यादी कार्यक्रम (क)वर्ग संस्था/ १२८० /२६ दि. ०४/०९/२०२६

**व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन २०२६ ते २०३१ (ड वर्ग संस्था)**

**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, नियम, १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ (सुधारणासह) चे नियम २ (तीन) (१ ते १२) आणि नियम ७५(२)(क) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक जा.क्र.१७७१ दि. २०/०५/२०२० मधील तरतुदी/सुचने नुसार दिनांक ०१/०२/२०२६ या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या खालील एकुण सहा (०१) क वर्ग सहकारी संस्थांच्या तयार केलेल्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव |
|---|---|
| १ | गुरु रविदास महिला सहकारी पतसंस्था म. नांदेड, ता. जि. नांदेड. |

| अ.क्रं. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | ०७/०९/२०२६ | स. ११.०० वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | ०७/०९/२०२६ ते १५/०९/२०२६ | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | २१/०९/२०२६ | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड . |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | २१/०९/२०२६ | स. ११.०० वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |

स्वाक्षरीत
(किशन बा. फिसके)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी
तथा उपनिबंधक सहकारी संस्था,ता.नांदेड

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२, नांदेड**

**पत्ता :-जंगमवाडी, नांदेड**

E-mail :- cevpd2@gmail.com दूरध्वनी क्र. 02462-260960

**ई- निविदा सूचना क्र. 04 सन 2026-27**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता,विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२. नांदेड,जलसंपदा विभाग,महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई.निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२. नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| 1. | कामाचे नाव :- | :उनकेश्वर उच्च पातळी बंधारा प्रकल्पाचे उर्वरीत स्थापत्य कामे . |
| 2. | कामाचा जिल्हा | : नांदेड (महाराष्ट्र राज्य) |
| 3. | निविदेची किंमत | :रु. 3040.97 लक्ष (वस्तु व सेवा कर वगळून) |
| 4. | ई निविदा उपलब्ध कालावधी | :दि. 07/09/2026 ते दि.21/09/2026 |
| 5. | ई निविदा उघडण्याचा दिनांक | : दि.24/09/2026 रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| 6. | इसारा / बयाना रक्कम | :रु.15.20 लक्ष |
| 7. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | : 24 महिने |
| 8. | ई निविदा संचाचीकिंमत | :रु.5,900/- (वस्तु व सेवा कर सह) |
| 9. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | : निविदेतील अटी व शर्ती पुर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

ई निविदा बाबत सर्व माहिती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

) शासनाचे संकेतस्थळ -https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल(.

) कार्यकारी अभियंता, विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२, नांदेड यांचे कार्यालयातील नोटीस बोर्ड.

जा.क्र.विप्रविक्र.2 /लेखा-4/ निविदा /1964/सहपत्र दिनांक- 02/09/2026

कार्यालय - कार्यकारी अभियंता,
विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र.२ नांदेड

(दिपराज सि. बागुल)
कार्यकारी अभियंता
विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.2
नांदेड

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# वीज समस्यांवर लोकप्रतिनिधी आक्रमक; महावितरणच्या अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात झाडाझडती

## बेशिस्त महावितरण प्रशासनाला लोकप्रतिनिधी ताळ्यावर आणणार?

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, शेतीपंपांच्या वीजेचा प्रश्न, ट्रान्सफॉर्मरची कमतरता, प्रलंबित वीज जोडण्या आणि नागरिकांच्या तक्रारींच्या निवारणातील दिरंगाईवरून महावितरणच्या कारभाराची चार खासदार आणि पाच आमदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत चांगलीच झाडाझडती घेतली. वीज पुरवठ्याच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करून नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. बैठकीचा सविस्तर अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी दिली.



गेल्या दोन- तीन वर्षांपासून जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात वीजपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. वारंवार वीज खंडित होणे, तक्रारी करूनही त्यांचे वेळेत निराकरण न होणे, ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्यानंतर तो बदलण्यासाठी लागणारा विलंब आणि शेतीपंपांना अपेक्षित वीजपुरवठा न मिळणे, या समस्यांमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील वीज व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यासाठी शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली.

बैठकीनंतर बोलताना खा. अशोक चव्हाण यांनी जिल्ह्यात विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असताना त्या तुलनेत वीज वितरणाची पायाभूत यंत्रणा अपुरी पडत असल्याचे निदर्शनास आणून दिले. महावितरणशी संबंधित अनेक तक्रारी असून त्यांचे निराकरण करण्याबरोबरच राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी आणि धोरणात्मक प्रश्नांवरही बैठकीत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक पातळीवरील प्रश्न तिथेच सोडविण्यात येतील, तर राज्य व केंद्र शासनाशी संबंधित प्रश्न वरिष्ठ पातळीवर मांडले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. येत्या आठ-दहा दिवसांत पुन्हा बैठक घेऊन कार्यवाहीचा आढावा घेतला जाणार आहे.

खा. रवींद्र चव्हाण यांनी वीजपुरवठा हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा आणि विकासाचा महत्त्वाचा आधार असल्याचे सांगत नागरिक व शेतकऱ्यांच्या अडचणी तातडीने सोडविण्याची मागणी केली. नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांनीही अखंडित वीजपुरवठा ही नागरिकांची मूलभूत गरज असल्याचे सांगून प्रलंबित तक्रारी, शेतीपंपांचा वीजपुरवठा आणि स्थानिक अडचणींकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे निर्देश दिले.

आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपल्या मतदारसंघातील प्रलंबित वीज जोडण्या, ट्रान्सफॉर्मरच्या समस्या आणि वीजपुरवठ्याच्या तक्रारी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. या प्रश्नांवर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. रवींद्र चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. श्रीजया चव्हाण, आ. जितेंद्र अंतापूरकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, जिल्हाधिकारी राहुल कार्डिले, महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय खंदारे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये उभे राहणार अहिल्यादेवींचे स्मारक; ऑक्टोबर अखेर काम पूर्ण होणार



**नांदेड (प्रतिनिधी)** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नांदेड येथील प्रस्तावित स्मारकाच्या कामाला आता वेग येणार असून, ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत स्मारकाचे काम पूर्ण होईल, असा विश्वास नांदेड महापालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांनी व्यक्त केला. स्मारकाच्या बांधकामासोबतच परिसराच्या सुशोभीकरणाचे कामही वेगाने करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्मारकाच्या कामाच्या अनुषंगाने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांची भेट घेऊन सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला आणि ऐतिहासिक योगदानाला साजेसे भव्य व आकर्षक स्मारक उभारण्याबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. नांदेड शहराच्या वैभवात भर घालणारे हे स्मारक महाराष्ट्रातील प्रमुख स्मारकांच्या यादीत स्थान मिळवेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. स्मारकाचा परिसर अधिक आकर्षक आणि देखणा करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून सुशोभीकरणाचे काम वेगाने पूर्ण केले जाईल, असे आयुक्त डोईफोडे यांनी स्पष्ट केले.

यावेळी ॲड. शिवाजीराव हाके, इंजि. बालाजी काळे, गणेशराव काकडे, महेंद्र देमगुंडे, निळकंठ मदने, अशोक काळे, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, दिलीप टेळकीकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी प्रा.डॉ. मुरहरी कुंभारगावे लिखित 'मंथन होळकरशाहीचे' या ग्रंथाची प्रत आयुक्त महेश डोईफोडे यांना भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



**नांदेड**– नांदेड जिल्हा पद्मशाली उपवधू-वर परिचय मेळावा कौठा येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे रविवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी मार्गदर्शन करताना माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, व्यासपीठावर आ. अमरनाथ राजूरकर, आ. आनंदराव पा. बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, महापौर कविता मुळे, माजी आ. कैलास गोरंट्याल, श्रीधरराव सुंकरवार, प्रल्हाद सुरकुटवार, लक्ष्मीकांत गोणे, शिवाजी अन्नमवार आदी. **(छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)**

# पत्नीला नांदू देत नसल्याच्या रागातून वडील व भावावर चाकू हल्ला; आरोपीस अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** – पत्नीला आपल्यासोबत नांदू देत नसल्याच्या कारणावरून एका तरुणाने वडील आणि भावावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना ३ सप्टेंबर रोजी दुपारी भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वेदांतनगर, मालेगाव रोड परिसरात घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नितीन अशोक धमणे (वय ३०, रा. वेदांतनगर) याने फिर्यादी अशोक विठ्ठलराव धमणे यांचा मुलगा कृष्णा अशोक धमणे याला दुपारी १ वाजण्याच्या सुमारास शिवीगाळ केली. तुम्ही माझ्या बायकोला माझ्यासोबत नांदू का देत नाही, असे म्हणत त्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने गळ्यावर व तोंडावर वार केले. या हल्ल्यात कृष्णा गंभीर जखमी झाला.

फिर्यादी अशोक धमणे यांच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात आरोपी नितीन धमणे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९(१), ३५१(३) व शस्त्र अधिनियम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## इकडचं तिकडचं

# स्वातंत्र्याची व्याख्याच बदलली का?

''डीजे वाजवायचा न्हाई, मंजी वरसाला एखांद्याबार बी आमी आनंद साजरा करायचा न्हाई, सारखं काम करुकरुच मरायचं; साखर आंशी रुपये किलो, मंजी आमी 'च्या' प्यायचा न्हाई आन गोडधोड बी खायाचं न्हाई; मटणाच्या एका किलवाला आठशे रुपये लागत्यात, मंजी आमच्या चुलीवर ऐतवारी बी वरणाचंच भगुनं मांडायचं! आवो, काय खावं, काय खाऊ न्हाई, सणवार कसे करावे, हेबी आता मायबाप सरकार ठरविणार व्हयं? मंजी आता पुन्ना गुलामीचे दिवसं आल्यात का?'' मध्यमवर्गीय महिलेच्या तोंडून निघालेले हे शब्द सध्या समाजमाध्यमांवर चांगलेच व्हायरल होत आहेत. गावाकडच्या अस्सल बोलीत व्यक्त झालेली ही खदखद अनेकांना हसवतेय, तर अनेकजण मात्र या शब्दांमध्ये आपल्या मनात दडलेलीच भावना व्यक्त झाल्याचे सांगत आहेत. अगदी उच्चभ्रू वस्त्यांपासून गावच्या पारावरच्या गप्पांपर्यंत या व्हीडीओची चर्चा रंगताना दिसतेय. कुणाला हा व्हीडीओ विनोदाचा विषय वाटतोय, तर कुणी त्याकडे सरकारच्या निर्णयांवर सामान्य माणसाने व्यक्त केलेला संताप म्हणून पाहतोय. शेवटी प्रश्न साधा आहे; सण कसा साजरा करायचा, काय खायचं, काय खायचं न्हाई, हे ठरविण्याचा अधिकार कुणाचा?

याच विषयावर नांदेड शहरातील एका कॉलेजसमोरच्या रसवंतीगृहात गप्पांचा फड रंगला होता. हातात रसाचा ग्लास, समोरच्या बाकावर मंडळी आणि विषय अर्थातच तोच; व्हायरल झालेली बाई आणि तिचं पुन्ना गुलामीचे दिवस आले का? हे वाक्य! सरकार कुठलाही निर्णय घेतलं की त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटणारच. सध्याच्या सरकारवर हुकूमशाहीचा शिक्का मारत सडकून टीका करणारे आहेत, तर सरकारच्या निर्णयांचं समर्थन करणारेही कमी नाहीत.

चर्चेत सहभागी असलेले एक प्राध्यापक म्हणाले, हल्लीच्या राजकारणात एक गोष्ट मात्र प्रकर्षाने बदलली आहे. सरकारवरील टीका-टिप्पणी आता केवळ वैचारिक मतभेदापुरती मर्यादित राहिलेली नाही. अनेकदा त्यामागे सुडबुद्धीचा वासही जाणवतो. विरोध असावा, पण तो मुद्द्यांचा असावा.

त्यावर एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने मिश्कीलपणे प्रश्न टाकला, ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी डीजेमुक्तीचा निर्णय ज्या तातडीने घेतला गेला, त्याच तातडीने दुष्काळ, शेतकऱ्यांची कर्जबाजारी अवस्था, महागाई आणि वारंवार होणाऱ्या पेपरफुटीवर सरकार निर्णय का घेत नसेल? सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे नाहीत का?

पन्नाशीतील एका गृहस्थाने सगळ्यांचं बोलणं शांतपणे ऐकलं आणि म्हणाले, तुमची चर्चा ऐकून लहानपणीच्या पुस्तकातला 'पिता-पुत्र आणि गाढव' हा धडा आठवला. त्या गोष्टीतून दोन गोष्टी शिकायला मिळाल्या. पहिली म्हणजे दुसऱ्याच्या चुका काढण्यात प्रत्येकजण पटाईत असतो, आणि दुसरी म्हणजे तुम्ही एकाच वेळी सगळ्यांना खूश ठेवू शकत नाही. म्हणून शेवटी ऐकावं जनाचं, पण करावं मनाचं!

दरम्यान, चर्चेत नवे चेहरे येत होते. कुणी दोन मिनिटं थांबून आपलं मत मांडत होतं, कुणी मोबाईलवर तोच व्हीडीओ पुन्हा दाखवत होतं.

एका छोट्याशा व्हीडीओ क्लिपने किती मोठी चर्चा पेटवावी, याचं हे जिवंत उदाहरण होतं. प्रश्न फक्त डीजेचा नव्हता. प्रश्न होता सामान्य माणसाच्या जगण्याचा, त्याच्या आनंदाचा, त्याच्या स्वातंत्र्याचा आणि सरकारच्या निर्णयांकडे तो कोणत्या नजरेने पाहतो याचा. मी घड्याळावर नजर टाकली, वेळ बराच झाला होता. चर्चेचा फड अजून रंगणार होता; पण मला मात्र निघणं भाग होतं. मी हळूच तिथून काढता पाय घेतला आणि सीईटी सेंटरच्या दिशेने निघालो. रस्त्यात नकळत किशोरदांचं एक जुनं गाणं ओठांवर आलं, 'ये पब्लिक है ये सब जानती है!' आणि मनात एकच विचार घोळत राहिला; 'पुन्हा गुलामीचे दिवस आलेत का, की बदलत्या काळात स्वातंत्र्याची व्याख्याच आपण बदलून टाकलीय?'

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# लक्ष्मण गणगोपले यांचे निधन



**नरसीफाटा (प्रतिनिधी)** – बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील रहिवासी लक्ष्मण गंगाधर गणगोपले यांचे रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कुंडलवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, दोन मुले, सून, असा परिवार आहे. ते ओड समाजाचे राज्य सचिव नंदकिशोर टोकलवाड नरसीकर यांचे मेहुणे होत.

# नांदेडमध्ये दुचाकी, कॅमेरा- लॅपटॉप चोरणारी टोळी जेरबंद; एलसीबीची कारवाई, १.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात दुचाकी चोरी व घरफोडीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेने तीन सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश करत ३ गुन्हे उघडकीस आणले असून, १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी एलसीबीचे पोउपनि साईनाथ पुयड यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, काही संशयित विना नंबरप्लेट दुचाकीवर हिंगोली गेट ते कोर्टाच्या मागील रस्त्यावर फिरत आहेत. त्यानुसार पथकाने दोन पंचांसह आंध्र समिती शाळेच्या भिंतीजवळ सापळा लावला. निळ्या



दुचाकीवर काळ्या बॅगसह थांबलेल्या तिघांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी क्षितीज शरद कांबळे (वय २१, रा. प्रभातनगर, नांदेड), सुमेध गोपाळ लांबा (वय २३, रा. प्रभातनगर, नांदेड) आणि गोविंद मनोज खंडागळे (वय १८, रा. सम्राट अशोकनगर, नांदेड) यांना अटक करण्यात आली. चौकशीत त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली.

जप्त मुद्देमाल व उघड गुन्हे – भाग्यनगर गु.र.नं. ४७८/२०२६ कलम ३०५, ३३१(४) BNS बी.के. हॉल, श्रीनगर येथील बंद दुकानाचे शटर फोडून दोन डेपू कॅमेरे (६०००, M५) व एक लेन्स चोरी (किंमत १ लाख १५ हजार रुपये) विमानतळ कलम ३०३(२) BNS निळ्या रंगाची ॲक्टिवा चोरी (किंमत ४० हजार रुपये), आरोपी क्षितीजकडून जप्त. यात यश तारु हा फरार. भाग्यनगर गु.र.नं. ४७०/२०२६ कलम ३०३(२) BNS वेदांत येथील राज पार्क पार्किंगमधून Splendor चोरी, जी आधीच जप्त आहे.

लॅपटॉप चोरी – आरोपी क्षितीजकडून काळा DELL Vostro १५ लॅपटॉप (३० हजार रुपये) जप्त, जो पुण्यातील हिंजवडी येथून चोरल्याचे त्याने सांगितले. एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल भाग्यनगर व विमानतळ पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आला. तिन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# पोळा व गणेशोत्सवानिमित्त अर्धापुरात शांतता समितीची बैठक

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –आगामी काळात होणाऱ्या पोळा व गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शांतता समितीची बैठक मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी माँ जिजाऊ मंगल कार्यालय अर्धापूर येथे दुपारी १२ वा. आयोजित केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी दिली आहे.

आगामी काळातील होणाऱ्या पोळा, गणेशोत्सव, सण व उत्सवाच्या निमित्त शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटिल, उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेंद्रे, तहसीलदार, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी,वीज वितरण कंपनीचे उपअभियंता पंकज देशमुख आदींसह अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

या बैठकीत अर्धापूर तालुक्यातील सरपंच, चेअरमन, आजी-माजी पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य व गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी केले आहे.

# चौकशी अहवालानंतरही मुख्याध्यापकांच्या निलंबनाचा निर्णय रखडला

## आजपासून आमरण उपोषण | मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तक्रारदारांचा सवाल

**नांदेड (प्रतिनिधी)** –नायगाव तालुक्यातील मुगाव तांडा येथील मुख्याध्यापक मनोहर गायकवाड यांच्या विरोधात करण्यात आलेल्या तक्रारींच्या चौकशीनंतरही पुढील प्रशासकीय कारवाई होत नसल्याने या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. गटशिक्षणाधिकारी दर्शनवाड, नायगाव यांनी केलेल्या चौकशीत संबंधित मुख्याध्यापक दोषी असल्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केल्याचा दावा तक्रारदार जनार्दन गायकवाड पाटील यांनी केला आहे. मात्र अहवाल प्राप्त होऊनही निलंबन किंवा विभागीय चौकशीबाबत निर्णय झालेला नसल्याने त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

गेल्या दीड महिन्यांपासून तक्रारी, निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. चौकशी अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर झाल्यानंतरही कारवाईचा निर्णय प्रलंबित राहणे ही बाब गंभीर असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) वंदना फुटाणे यांच्या भूमिकेबाबतही तक्रारदारांनी सवाल उपस्थित केले आहेत. चौकशी अहवालात गंभीर बाबी निदर्शनास आल्या असतील, तर त्यावर नियमानुसार कारवाई का करण्यात आली नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

**न्यायालयीन उपस्थिती आणि शाळेतील हजेरीबाबतही प्रश्न**

तक्रारदारांनी दिलेल्या निवेदनात मुख्याध्यापकांच्या न्यायालयीन कामकाजातील उपस्थिती आणि त्याच दिवशी शाळेतील उपस्थिती नोंदविण्याच्या बाबीवरही आक्षेप नोंदविण्यात आला आहे. एकाच दिवशी न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहणे आणि शाळेत उपस्थित असल्याची नोंद होणे शक्य आहे का, याची प्रशासनाने सखोल तपासणी केली आहे का, असा सवाल करण्यात आला आहे.

तसेच शासकीय सेवेशी संबंधित नियमांचे कथित उल्लंघन झाले असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**'दोषी आढळले तर कारवाई का नाही?'**

चौकशी अहवालात दोष आढळूनही त्यानंतरची निर्णयप्रक्रिया सुरू होत नसेल, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीचीच चौकशी करण्याची गरज असल्याचे तक्रारदार जनार्दन गायकवाड पाटील यांनी म्हटले आहे. एखाद्या कर्मचाऱ्याविरुद्ध चौकशीत गंभीर बाबी स्पष्ट झाल्यानंतरही कारवाईला विलंब होत असल्यास त्यातून संबंधितांना अभय मिळत असल्याचा संदेश जाऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार निर्णय होणे अपेक्षित आहे. मात्र निर्णयच होत नसेल तर या विलंबामागील कारणेही स्पष्ट झाली पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पद्मावती कोडगिरे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड शहरातील प्रतिष्ठित महिला नागरिक पद्मावती बालाजी कोडगिरे (वय ७५) यांचे रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल आ. डॉ. तुषार राठोड, बाबुराव देबडवार, डॉ. अतुल देबडवार, डॉ. अशोक कौरवार, डॉ. श्रावण रॅपनवाड, सुशील पत्की यांच्यासह अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# सौ.अरुणा खडकेकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –हडकोतील रहिवासी सौ. अरुणा जगदीशराव खडकेकर यांचे दि. ५ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ६९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सिडकोतील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

सेवानिवृत्त केंद्र प्रमुख जगदीशराव खडकेकर यांच्या त्या पत्नी तर अमोल खडकेकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, मुलगी, जावई असा परिवार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com